अहवाल क्रमांक १२४

पंचायती राज समिती

(२००८-२००९)

(अकरावी महाराष्ट्र विधानसभा)

तिसरा अनुपालन अहवाल

(पंचायती राज समितीच्या सन १९९६-९७ च्या पाचव्या अहवालातील नाशिक, वर्धा व लातूर जिल्हा परिषदांच्या लेख्यावरील लेखा परीक्षण पुनर्विलोकन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईवरील समितीचा अनुपालन अहवाल)

(सदर अहवाल दिनांक २३ डिसेंबर, २००८ रोजी विधानसभेच्या / विधानपरिषदेच्या पटलावर ठेवण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर.
२००८

पंचायती राज समिती

(२००८-२००९)

(अकरावी महाराष्ट्र विधानसभा)

तिसरा अनुपालन अहवाल

(पंचायती राज समितीच्या सन १९९६-९७ च्या पाचव्या अहवालातील नाशिक, वर्धा व लातूर जिल्हा परिषदांच्या लेख्यावरील लेखा परीक्षण पुनर्विलोकन अहवालाच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईवरील समितीचा अनुपालन अहवाल)

पंचायती राज समिती
(२००८ - २००९)
(दिनांक १४ ऑगस्ट २००८ पासून)

समिती प्रमुख

(१) श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स.

समिती सदस्य

(२) श्री.नानाभाऊ पंचबुध्दे, वि.स.स.
(३) श्री. रमेशभाई कदम, वि.स.स.
(४) श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.
(५) श्री.संपतराव अवघडे, वि.स.स.
(६) श्री.श्रीनिवास देशमुख, वि.स.स.
(७) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.
(८) श्री.पी.एन.पाटील, वि.स.स.
(९) श्री.सुभाष बने, वि.स.स.
(१०) श्री.राजेंद्र मुळक, वि.स.स.
(११) श्री.पद्माकर वळवी, वि.स.स.
(१२) श्री.डी.एस.आहिरे, वि.स.स.
(१३) श्री.आशिष जयस्वाल, वि.स.स.
(१४) श्री.तुकाराम सुर्वे, वि.स.स.
(१५) श्री.आण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.
(१६) श्रीमती अनुसया खेडेकर, वि.स.स.
(१७) श्री.अतुल देशकर, वि.स.स.
(१८) श्री.टी.पी.कांबळे, वि.स.स.
(१९) श्री.विष्णू सवरा, वि.स.स.
(२०) श्री.हेमंत पटले, वि.स.स.
(२१) श्री.राजन तेली, वि.प.स.
(२२) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.
(२३) श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.
(२४) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
(२५) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>

श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री.भा.ना. कांबळे, सह सचिव
श्री.वि.वा.देशमुख,उप सचिव
श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव
श्री.श.बा.गायकवाड, कक्ष अधिकारी
श्री.सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी

पंचायती राज समिती
(२००७ - २००८)
(दिनांक १४ ऑगस्ट २००७ पासून)

समिती प्रमुख

(१) श्री.राजन पाटील, वि.स.स.

समिती सदस्य

(२) श्री.नानाभाऊ पंचबुध्दे, वि.स.स.

(३) श्री.दिलीप बनसोडे, वि.स.स.

(४) श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स.

(५) श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

(६) श्री.श्रीनिवास देशमुख(गोरठेकर), वि.स.स.

(७) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.

(८) ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.

(९) श्री.सुभाष बने, वि.स.स.

(१०) श्री.राजेंद्र मुळक, वि.स.स.

(११) श्री.विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१२) श्री.सुनिल केदार, वि.स.स.

(१३) श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.

(१४) श्री.कैलास पाटील, वि.स.स.

(१५) श्री.विश्वास नांदेकर, वि.स.स.

(१६) श्री.संजय राठोड, वि.स.स.

(१७) श्री.अतुल देशकर, वि.स.स.

(१८) श्री.उत्तम इंगळे, वि.स.स.

(१९) श्री.विष्णू साहेबराव घोडे, वि.स.स.

(२०) श्री.सदाशिव लोखंडे, वि.स.स.

**(२१) रिक्त.

(२२) श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

(२३) श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.
(२४) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
(२५) श्री.रामनाथ मोते, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री.भा.ना. कांबळे, सह सचिव
श्री.वि.वा.देशमुख,उप सचिव
श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव
श्री.श.बा.गायकवाड, कक्ष अधिकारी
श्री.सुभाष नलावडे, कक्ष अधिकारी

*सन्माननीय सदस्य श्री.दिलीपकुमार सानंदा यांनी पंचायती राज समितीच्या सदस्यात्वाचा राजिनामा दिल्यामुळें रिक्त झालेल्या पदावर दिनांक २४ जुलै २००७ रोजी श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली.

**श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांची दिनांक २४ एप्रिल २००८ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे पद रिक्त आहे.

प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन समितीच्या सन १९९६-१९९७ च्या पाचव्या अहवालातील नाशिक, वर्धा व लातूर जिल्हा परिषदांच्या लेख्यावरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालासंबंधीच्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाईसंबंधी पहिला अनुपालन अहवाल सादर करीत आहे.

समितीचा पाचवा अहवाल महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहांना दिनांक ११ एप्रिल २००१ रोजी सादर करण्यात आला.

शासनाने समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईच्या संबंधात जारी केलेले आदेश, परिपत्रके इत्यादी परिशिष्ट "अ" मध्ये समाविष्ट केले आहेत. शासनाकडून आलेल्या माहितीच्या संदर्भात समितीने दिनांक ६ मे २००८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये दिले आहे.

तथापि, त्या अहवालातील समितीच्या शिफारशींवर शासनाने केलेली कारवाई विचारात घेतल्यानंतर समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात समाविष्ट केले आहेत.

श्री.एस.के.गोयल, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग(अतिरिक्त कार्यभार), श्री.अजितकुमार जैन,प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.विद्याधर कानडे, प्रधान सचिव, वित्त विभाग(व्यय), श्रीमती शर्वरी गोखले, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.एकनाथ पाटील, सचिव,(ला.क्षे.वि.), जलसंधारण विभाग. श्री.दी.बा.देशपांडे,सचिव(बांधकाम)सार्वजनिक बांधकाम विभाग, तसेच श्री.दीपक चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक जिल्हा परिषद, श्रीमती गुन्जन किन्नू, मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा जिल्हा परिषद व प्रविण गेडाम, मुख्य कार्यकारी अधिकारी लातूर जिल्हा परिषद, यांनी समितीला कामकाजात दिलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

सन २००८-२००९ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने दिनांक १० सप्टेंबर, २००८ रोजी अहवाल विचारात घेऊन तो संमत केला.

विधान भवन,
मुंबई
दिनांक :१० सप्टेंबर, २००८

श्री.सुभाष ठाकरे,
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विषय (२)		पृष्ठ क्रमांक (३)
	जिल्हा परिषद, नाशिक (लेखा)	..	१ ते ४
१	जिल्हा परिषद बांधकाम व पाटबंधारे विभागातील अपूर्ण स्थितीतील बांधकामे. (लेखा प.क्र.३.२६१(४))		
२	जुनी वाहने यंत्रसामुग्री रोड रोलर निर्लेखीत करण्याबाबत. (लेखा प.क्र.३.२६२(९),)	..	५ ते ७
	जिल्हा परिषद, वर्धा(लेखा)	..	८ ते १२
३	रोखपालाने केलेल्या रकमेच्या अपहाराबाबत. (लेखा प.क्र.३.१३५),		
	जिल्हा परिषद, लातूर(लेखा)	..	१३ ते १७
४	ग्रामीण स्वच्छता योजने अंतर्गत शौचालये बांधकामावरील खर्च. (लेखा प.क्र.३.२२),		
५	मागासविकास गटातील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य वाटपाबाबत. (लेखा प.क्र.३.५७),	..	१८ ते २३
६	खाजगी प्राथमिक शाळांना वेतन अनुदानाचे दुबार प्रदानामुळे झालेली अनियमितता (लेखा प.क्र.३.५८),	..	२४ ते २५
७	ढाकणी कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजनेच्या कामात ठेकेदाराला अतिप्रदान. (लेखा प.क्र.३.१४९),	..	२६ ते ३०
८	लेखा परिच्छेदांवर कारवाई करणेबाबत	..	३१

लेखा अहवाल

जिल्हा परिषद, नाशिक (लेखा)

१)जिल्हा परिषद बांधकाम व पाटबंधारे विभागातील अपूर्ण स्थितीतील बांधकामे:-

(लेखा प.क्र.३.२६१(४))

समितीने नाशिक जिल्हा परिषदेअंतर्गत जिल्हा परिषद बांधकाम व पाटबंधारे विभागातील अपूर्ण स्थितीतील बांधकामे यांचा आढावा घेतला असता दिनांक ३१ मार्च १९९७ अखेर ८०० कामे पूर्ण अवस्थेत असल्याचे समितीला सांगण्यात आले. या अपूर्ण कामावर लेखा परीक्षकांनी दाखवून दिल्याप्रमाणे रुपये ५,५१,७१०० इतकी प्रचंड रक्कम अडकून पडली आहे. ही कामे रेंगाळण्याची मुख्य कारणे विशद करताना कंत्राटदारांनी कामे वेळीच पूर्ण न करणे, निधीचा अभाव, वनजमिनी संबंधी प्रकरणे, शेतकऱ्यांनी कामासाठी जमिनी उपलब्ध करून देण्यास अडथळा इ. कारणे देण्यात आली. आता ८०० कामांपैकी सन २००१ मध्ये ७२७ कामे पूर्ण झाली असून ७३ अपूर्ण कामांपैकी ९ कामे वर्ग करण्यासंबंधीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. म्हणजे ६४ कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. कामे अपूर्ण राहण्याचे मुख्य कारण कंत्राटदाराने कामे विहित मुदतीत पुर्ण न करणे असे प्रामुख्याने असल्याचे सांगण्यात आले. नाशिक जिल्हा परिषदेने बहुतांश कामे अपुर्ण असताना देखील सुमारे २ ते ३ वर्षे कालावधी लोटल्यानंतरही कंत्राटदाराला साधी नोटीसही पाठविली नाही. त्याचप्रमाणे बहुतांशी ठिकाणी वसुलीच्या बाबतीतही पावले उचलली जात नाहीत, फक्त कंत्राटदारांची एजन्सी रद्द केली जाते, परंतु त्यांची कामे दुसरीकडे सुरू राहतात. समितीने जिल्हा परिषदांना दिलेल्या भेटीमध्ये अपूर्ण बांधकामाच्या बाबतीत असे आढळून आले की, अपूर्ण बांधकामे तशीच ठेवून नव्या बांधकामांना मंजुरी दिली जाते. त्यामुळे जुनी बांधकामे अनेक वर्षापर्यंत प्रलंबित राहतात व त्यात नवीन बांधकामाची भर पडत असते. त्यामुळे समितीने आपल्या पाचव्या अहवालामध्ये अशी शिफारस केली की, या पुढील काळात जिल्हा परिषदेला देण्यात येणाऱ्या एकंदर निधीपैकी ७० टक्के निधी हा अपूर्ण बांधकामासाठी राखून ठेवण्यात यावा व ३० टक्के निधी नवीन कामासाठी देण्यात यावा. कामाला प्रशासकीय मान्यता देण्याच्या संदर्भातील अधिकार हा जिल्हा परिषदेचे संबंधित खाते प्रमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी व विशेष समितीचे सभापती यांचा आहे. कामाला मान्यता देणे म्हणजे प्रशासकीय मान्यता देणे नव्हे. समितीला अनेक जिल्हा परिषदांच्या बाबतीत असे आढळून आले की, कामाची यादी ३-४ वर्षापूर्वी मंजूर करून ठेवलेली असते. परंतु कंत्राटदार नेमलेले नसतात. त्याचे कारण म्हणजे हा विषय जिल्हा परिषदेच्या सभेपुढे येत नाही व परिणामी प्रशासकीय मान्यता दिली नाही असे सांगितले जाते. तेव्हा ग्राम विकास विभागाने एक परिपत्रक काढून जिल्हा परिषदेने त्यांच्या ''जिल्हा निधीमधून'' घ्यावयाच्या कामाच्या बाबतीत जिल्हा परिषदेच्या लेखा संहितेप्रमाणे मान्यता दिली पाहिजे. तसेच कंत्राटदार निश्चित केल्यानंतर तो जर बरोबर काम करत नसेल तर ते पाहण्याची जबाबदारी संबंधित खाते प्रमुखाची राहील. कामाला उशीर होत

असेल किंवा आवश्यकतेपेक्षा अधिक खर्च होत असेल तर संबंधित कंत्राटदाराला दंड करुन त्या खर्चाची वसुली करुन संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावे. कामास उशीर झाल्यास पर्यवेक्षकीय काम करणाऱ्या अधिकाऱ्याच्या गोपनीय अहवाल तशा प्रकारची नोंद घेण्यात यावी अशीही समितीची शिफारस होती.

या शिफारशी संदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाही बाबत समितीला पुरविलेल्या लेखी जलसंधारण विभागाने असे नमूद केले की,

"दिनांक १ ऑक्टोबर २००१ अन्वये या प्रकरणी सर्व जिल्हा परिषदांना सूचना दिलेल्या आहेत (परिशिष्ट-अ) त्यानुसार अपूर्ण कामे व नवीन कामांसाठी किती निधी खर्च केला याचे विवरण पत्र जून अखेर सादर करण्याविषयी कळविले आहे"

समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची दिनांक ६ मे २००८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, कंत्राटदारांनी कामास विलंब केला म्हणून किती कंत्राटदारावर कारवाई करण्यात आली याबाबत खुलासा करताना मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद नाशिक यांनी समितीला असे सांगितले की, कामामध्ये विलंब केल्यामुळे बांधकाम विभागाने २० कंत्राटदारांवर कारवाई केली असून त्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. तर पाटबंधारे विभागाने २७ कंत्राटदारांवर कारवाई केली असून त्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे. बांधकाम विभागाने कंत्राटदारांकडून **अनामत रक्कम** रुपये १,९५,७९८ वसूल केले आहे. तर लघु पाटबंधारे विभागाने रुपये २,९३,३४८ वसूल केले आहेत, तसेच समितीने ज्या अधिकाऱ्यांनी सदर कामात कुचराई केली आहे. त्यांच्यावर आपण कोणती कारवाई केली आहे. याबाबत विचारणा केली असता याबाबतची माहिती उपलब्ध नाही असे सांगण्यात आले. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, सन २००१ मध्ये समितीने आपला अहवाल विधानसभेला सादर केला आहे. त्यावेळी समितीने आपल्या अहवालामध्ये या प्रकरणी ज्या अधिकाऱ्यांनी चूक केली आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे सूचीत केले होते. जवळजवळ पाच लाख रुपये वसूल करावयाचे असताना फक्त २.९३ लाख वसूल करण्यात आले आहेत उर्वरीत रक्कम आपण कधी करणार.यावर ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी असा खुलासा केला की, अपूर्ण कामावर अडकून राहिलेली ही रक्कम आहे. यापुढे ७० टक्के खर्च हा अपूर्ण कामावर व ३० टक्के खर्च हा नवीन कामावर करावा अशी शिफारस समितीने केली होती. त्याप्रमाणे पाटबंधारे विभाग आणि बांधकाम विभाग या दोन्ही विभागांनी परिपत्रक काढून कामे पूर्ण करण्याची कारवाई मोठ्या प्रमाणावर केली आहे. या संबंधी पाटबंधारे विभागाने दिनांक १ ऑक्टोबर २००१ रोजी परिपत्रक काढले आहे व दिनांक २३ जुलै २००१ रोजी बांधकाम विभागाने काढले आहे. या दोन्ही विभागाने पाच वर्षे अपूर्ण कामांवर निधी

खर्च केला आहे, पंचायती राज शिफारस होती की, आधी जुनी कामे पूर्ण करा आणि नवीन कामाला सुरुवात करावी. याची या दोन्ही विभागाने गांभीर्याने नोंद घेऊन कार्यवाही केली आहे. मागच्या वर्षाला आकडेवारीनुसार ६६ कामे अपूर्ण होती त्यापैकी ४७ कामे पूर्ण करण्यात आली आहेत म्हणजे एक वर्षामध्ये ६५ ते ७०% कामे पूर्ण केल्याचे दिसून येत आहे. सदर अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी विभागांनी दक्षता घेतली आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, अधिकाऱ्यांवर कारवाई करुन जबाबदार अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालामध्ये नोंद करण्यात यावी अशी समितीने शिफारस केली होती त्याप्रमाणे आपण किती अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालामध्ये नोंद केली आहे यावर ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी समितीला असा खुलासा केला की, जी जुनी अपूर्ण कामे होती. ती पूर्ण करण्यात आलेली आहेत. जिल्हा परिषदेमधील वर्ग-१ व वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांची सतत बदली होत असल्यामुळे ते अधिकारी एकाच ठिकाणी कायमस्वरुपी राहतात अशी परिस्थिती नसते. समितीचा मुख्य मुद्दा नवी कामे सुरु न करता जुनी अपूर्ण असलेली कामे पूर्ण करणे व त्यावर जास्त निधी खर्च करणे असा होता. त्याप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. दोन्ही विभागांनी कंत्राटदारांवर कारवाई केली आहे. कंत्राटदारांची अनामत रक्कम जप्त केली आहे व त्यांना काळ्या यादीत टाकले आहे. त्यावर समितीने कंत्राटदारांवर केलेल्या कारवाईबद्दल समाधान व्यक्त केले. परंतु ज्या अधिकाऱ्यांनी चूक केली आहे. त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये तत्संबंधीची नोंद करायला पाहिजे होती ती कां करण्यात आली नाही असे विचारले असता त्यावर समितीला असे सांगण्यात आले की, कंत्राटदारांमुळे काम पूर्ण करायला उशीर झाला तर अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करता येत नाही. पंचायती राज समितीने जी शिफारस केली होती. त्याप्रमाणे कामे पूर्ण करण्याची कार्यवाही विभागाने केलेली आहे. सतत पाच वर्षे जुन्या कामावर निधी खर्च करण्यात आलेला आहे. नवीन कामे घेण्यात आलेली नाही.

अभिप्राय व शिफारस :

समितीने जिल्हा परिषदेला भेट दिल्यानंतर समितीच्या असे निदर्शनास आले की, अनेक जिल्हा परिषदांमध्यं अपूर्ण बांधकामे तशीच ठेवून नवीन बांधकामांना मंजुरी दिली जाते त्यामुळे जुनी बांधकामे अनेक वर्षापर्यंत प्रलंबित राहतात व त्यात नवीन बांधकामांची भर पडत जाते. हे लक्षात घेऊन समितीने जिल्हा परिषदेला देण्यात येणाऱ्या एकूण निधीपैकी ७० टक्के निधी हा अपूर्ण बांधकामासाठी व ३० टक्के निधी नवीन कामासाठी राखून ठेवण्याबाबत, तसेच जिल्हा निधीमधून द्यावयाच्या कामांना जिल्हा परिषदेच्या लेखा संहितंप्रमाणे मान्यता दिली पाहिजे असे समितीने आपल्या शिफारशीमध्ये नमूद केले होते. अपूर्ण कामांसंबंधी शासनाने कार्यवाही केली असून सार्वजनिक बांधकाम व पाटबंधारे विभागाने त्याबाबत परिपत्रक काढले आहे. शिफारशीतील दुसऱ्या मुद्यात कंत्राटदार विहित अटी व शर्तीनुसार काम करीत नसल्यास त्यांच्याविरुध्द तात्काळ कारवाई

करण्याबाबत तसेच पर्यवेक्षक काम करणाऱ्या अधिकाऱ्याच्या गोपनीय अहवालात तशा प्रकारची नोंद घेण्याबाबत नमूद करण्यात आले होते. त्याप्रमाणे **दोन्ही विभागांनी कंत्राटदारांवर कारवाई केल्याचे व त्यांनी जमा केलेली अनामत रक्कम जप्त केल्याचे दिसून आले. तथापि कंत्राटदारांमुळे काम पूर्ण करायला उशीर झाल्यामुळे अधिकाऱ्यावर प्रशासकीय कारवाई करता येत नाही या विभागाच्या मताशी समिती सहमत होऊ शकत नाही. जिल्हा परिषद बांधकाम व पाटबंधारे विभागामार्फात केल्या जाणाऱ्या कामांवर संबंधित अधिकाऱ्यांचे योग्य प्रकारे नियंत्रण नसल्यामुळे काही वेळा बांधकामे अपूर्ण राहतात. कामे पूर्ण करण्यामध्ये दिरंगाई केल्यामुळे कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकले जाते, त्यांच्याकडून दंडनीय रक्कम वसूल केली जाते. परंतु संबंधित पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांवर कारवाई केली जात नाही. बांधकामे विहित वेळेनंतरही अपूर्ण राहिल्याबद्दल संबंधित कंत्राटदारावर नियमानुसार कारवाई करणे आवश्यकच आहे. तथापि, त्याच बरोबर ज्या पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांवर कामाची जबाबदारी सोपविलेली असते त्या अधिकाऱ्यांकडून कामाबाबत हेळसांड झाल्याचे निदर्शनास आल्यास, त्या अधिकाऱ्याची सखोल चौकशी करून त्यात तो अधिकारी दोषी आढळल्यास त्याच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(२)जुनी वाहने यंत्रसामुग्री रोड रोलर निर्लेखीत करण्याबाबत.-(जिल्हा परिषद, नाशिक)

जिल्हा परिषदांकडे निरुपयोगी व दुरुस्त न होण्याजोगी यंत्रसामुग्री बऱ्याच वर्षापर्यंत तशीच पडून असते असे समितीला जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी आढळून आले आहे. नाशिक जिल्हा परिषदेकडे १५ रोड रोलर नादुरुस्त अवस्थेत असल्यामुळे त्यांचा वापर होऊ शकला नाही. हे रोड सुमारे १९-२० वर्षापूर्वीचे आहेत, असे समितीला साक्षीच्यावेळी सांगण्यात आले. परिणामी जिल्हा परिषदेकडून ठेकेदारांना त्याच्याकडील यंत्रसामुग्री वापरण्यासाठी मुभा द्यावी लागली. प्रदीर्घ अवधीपर्यंत जिल्हा परिषदांकडे यंत्रसामुग्री नादुरुस्त अवस्थेत पडून राहणे कदापिही उचित नाही. समितीने वेळोवेळी विभागाच्या नजरेस ही बाब आणून दिल्यानंतर ग्रामविकास विभागाने दिनांक २२ नोव्हेंबर २००० रोजी शासन निर्णय काढून संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जुनी यंत्रसामुग्री निर्लेखित करण्यासाठी वा लिलावात काढण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आली. त्या समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याबरोबर मुख्य लेखा व वित्त अधिकारी अभियंता व उप अभियंता यांचा समावेश आहे. या समितीला जुनी यंत्रसामुग्री अथवा वाहने निर्लेखित करण्याचा अधिकार आता देण्यात आला आहे ही समाधानाची बाब आहे.

जिल्हा परिषदांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली निर्माण करण्यात आलेल्या समितीद्वारे जुनी व दुरुस्त न होऊ न शकणारी यंत्रसामुग्री तसेच जुनी वाहने लिलावाद्वारे विकण्यात यावी जेणेकरुन विनावापर यंत्रसामुग्री व वाहने जिल्हा परिषदांकडे प्रदीर्घ काळापर्यंत तशीच पडून राहणार नाही, अशी समितीची शिफारस होती.

उपरोक्त शिफारशीसंदर्भात जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत जिल्हा परिषदेने असे नमूद केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांनी उप अभियंता (यांत्रिकी), सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद नाशिक तसेच विशेष कार्याधिकारी व पदसिध्द उप विकास आयुक्त(रो.ह.यो.) यांच्याकडे दिनांक ४-३-२००३, १७-८-२००३, २५-८-२००३, २०-१०-२००३, ३-७-२००४, १४-१०-२००५, ४-१-२००६, २५-५-२००६, १५-६-२००६, २७-६-२००६, ४-५-२००७ रोजी पत्रव्यवहार केला असून वाहने निर्लेखित करण्याबाबत पाठपुरवठा चालू आहे."

तसेच शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत ग्रामविकास व जलसंधारण विभागाने असे नमूद केले की, "जिल्हाधिकारी (रो.ह.यो.) यांच्याकडे निर्लेखनाची कार्यवाही सुरु आहे."

६

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने प्रधान सचिव ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची दिनांक ६ मे २००८ रोजी साक्ष घेतली साक्षीच्या वेळी

समितीने अशी विचारणा केली की, जुनी वाहने निर्लेखित करण्याचे अधिकार आपल्याला आहेत काय यावर असे सांगण्यात आले की, जी यंत्रसामुग्री रोहयो अंतर्गत खरेदी करण्यात आली होती, ती सोडून जी यंत्रसामुग्री जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आली होती ती निर्लेखित करण्यात आली आहे. यामध्ये अन्य विभागांनी लोनवर दिलेल्या यंत्रसामुग्रीचा समावेश होत नाही. जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आलेल्या मशिनरीपैकी ८ मोठे रोड रोलर, ९ टॅन्कर आणि ८ छोटे रोड रोलर निर्लेखित करण्यात आली आहेत. यातून रुपये२८.००लाख जमा झाले आहेत. रोजगार हमी योजनेच्या फंडातून जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीसंबंधी नियोजन विभागाच्या मार्गदर्शनानुसार जी यंत्रसामुग्री अंतिमत: वर्ग करण्यात आली होती, तिची विल्हेवाट लावण्यात आली होती. जी मशनरी अंतिमत: वर्ग करण्यात आली नव्हती तिची विल्हेवाट केलेली नाही.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, असे प्रकार सर्व जिल्हा परिषदेमध्ये होतात. त्यामुळे यासंबंधी नवीन परिपत्रक काढून यंत्रसामुग्री निर्लेखित केली तर जास्त पैसे मिळतील. नाशिक जिल्ह्यामध्ये रोड रोलरचा वापर कमी असल्यामुळे अहवालामध्ये माहिती निरंक दाखविण्यात आलेली आहे. पंचायती राज समितीने सन २००१ मध्ये या बाबतचा अहवाल विधान सभेमध्ये सादर केलेला आहे. असे असताना अद्याप निकाल लागलेला नाही ही चिंतेची बाब आहे.

त्यावर विभागाच्या सचिवांनी समितीस असा खुलासा केला की, ८ मोठे आणि ४ छोटे रोड रोलरचे निर्लेखन करण्यात आलेले असून ज्या विभागात ज्यांची मूळ यंत्रसामुग्री होती. त्यांच्याकडून निर्लेखनाच्या संदर्भात आदेश यावयास पाहिजे परंतु अशा प्रकारचे आदेश आलेले नाहीत. अशा प्रकारच्या आदेशाबाबत आयुक्त कार्यालयाने दक्षता घेतली असती तर आपल्याला वाट पहावी लागली नसती. यासंदर्भात संबंधित खात्यांशी पत्रव्यवहार केलेला आहे. ज्या विभागाकडून आदेश आलेले आहेत. त्यासंदर्भात निर्लेखनाचे काम करण्यात आलेले आहे.

समितीने सदर खुलाशाच्या अनुषंगाने असे मत व्यक्त केले की, जुनी सामुग्री निर्लेखित करण्याच्या संदर्भात संपूर्ण राज्यात धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. संपूर्ण राज्यात निर्लेखनाच्या संदर्भात कार्यवाही झाली नाही तरी ही जुनी यंत्रसामुग्री सडून जाईल व नंतर त्यांचे निर्लेखन केले तर त्याचा काहीएक उपयोग होऊ शकणार नाही. त्यामुळे निर्लेखनाच्या बाबत संपूर्ण राज्याच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यावर सचिवांनी असे मत मांडले की, ज्या ज्या विभागात ज्यांची मूळ मशिनरी आहे त्यांनी निर्लेखनाच्या संदर्भात आदेश देणे आवश्यक आहे. यासंदर्भात संबंधित विभागाशी पत्रव्यवहार केलेला आहे. प्रत्येक विभागात समिती तयार करण्यात आलेली असून या समित्यांमध्ये वेगवेगळे सदस्य असतात त्यामुळे ती समिती निर्लेखनाच्या

संदर्भात किंमत ठरवत असते त्यानंतर कार्यवाही होत असते. यामध्ये वेगवेगळ्या खात्यांचे वेगवेगळे आदेश असतात. बांधकाम विभाग, कृषी विभाग, पाटबंधारे विभाग यांचेसुध्दा निर्लेखन करण्याच्या संदर्भात वेगवेगळे आदेश आहेत. त्यामुळे ज्या विभागांची मूळ मशिनरी आहे त्यांच्याकडून निर्लेखनाच्या संदर्भात आदेश येणे आवश्यक आहे. त्यावर समितीने असे मत

व्यक्त केले की, यंत्रसामुग्री निर्लेखित करण्याच्या संदर्भात ग्रामविकास विभागाशी समन्वय करुन निर्णय घ्यावा. त्यावर सचिवांनी समितीला असे सांगितले की, ग्रामविकास विभागाशी समन्वय करुन निर्णय घेण्यात येईल.

अभिप्राय व शिफारशी :-

जिल्हा परिषदेकडे निरुपयोगी व दुरुस्त न होण्याजोगी यंत्रसामुग्री बऱ्याच वर्षापर्यंत तशीच पडून असते. त्यामुळे अशा यंत्रसामुग्रीची कालांतराने झीज होवून तीचे निर्लेखन करणे देखील शक्य होत नाही. परिणामी शासनाचे आर्थिक नुकसान होते म्हणून जिल्हा परिषदांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली निर्माण करण्यात आलेल्या समितीद्वारे जुनी व दुरुस्त न होऊ शकणारी यंत्रसामुग्री, तसेच जुनी वाहने लिलावाद्वारे विकण्यात यावीत, अशी शिफारस समितीने केली होती. परंतु विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या व साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, **एखादी यंत्रसामुग्री निर्लेखित करण्यासाठी यंत्रसामुग्री ज्या विभागाच्या मालकीची असते. त्या विभागाच्या निर्लेखनाच्या आदेशाची आवश्यकता असते तसेच प्रत्येक विभागात यंत्रसामुग्री निर्लेखित करण्याबाबत समिती नियुक्त करण्यात आलेली असल्याने वेगवेगळ्या खात्याचे वेगवेगळे आदेश आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेकडील यंत्रसामुग्री निर्लेखित करण्यास विलंब होत आहे. परिणामी अशी यंत्रसामुग्री वर्षानुवर्षे जिल्हा परिषदेकडे पडून राहते व कालांतराने तीची झीज होवून निर्लेखन करणे देखील शक्य होत नाही व त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होते.**

सबब, उपरोक्त बाबीचा साकल्याने विचार करता, समितीच्या मते जुनी सामुग्री, यंत्रसामुग्री, इत्यादी निर्लेखित करण्याच्या संदर्भात संपूर्ण राज्यात धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. संपूर्ण राज्यात निर्लेखनाच्या संदर्भात कारवाई झाली नाही तर ही जुनी यंत्रसामुग्री तशीच पडून राहील व नंतर तिचे निर्लेखन केले तर त्याचा काही एक उपयोग होणार नाही. ही बाब विचारात घेता जिल्हा परिषदेकडील नादुरुस्त यंत्रसामुग्री निर्लेखित करण्यासाठी ग्रामविकास विभागाने सर्व संबंधित विभागांशी विचार-विनिमय करुन नादुरुस्त यंत्रसामुग्री निर्लेखित करण्याचा धोरणात्मक निर्णय लवकरात लवकर घ्यावा आणि तसे परिपत्रक काढून संबंधितांना कळविण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

जिल्हा परिषद, वर्धा(लेखा)

(३)रोखपालाने केलेल्या रकमेच्या अपहाराबाबत-जिल्हा परिषद, वर्धा(लेखा) (३.१३५)

वर्धा जिल्हा परिषदेअंतर्गत सन १९९४-९५, १९९५-९६ व १९९६-९७ या तीन वर्षांमध्ये रोखपाल श्री.कुकडे यांनी रुपये ३.७१ लाखाची अफरातफर केली. सहाय्यक लेखा अधिकारी आणि

तत्कालीन कार्यकारी अभियंत्यानी वेळीच या प्रकरणी लक्ष दिले नसल्यामुळे मयत रोखपाल श्री.कुकडे यांना रकमेची अफरातफर करण्यास वाव मिळाला. तत्कालीन सहाय्यक लेखा अधिका-यांवर व संबंधित इतर कर्मचा-यांवर ते जिल्हा परिषदेचे अधिकारी/कर्मचारी असल्यामुळे कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे असे मुख्य कार्यकारी अधिका-यांनी समितीस सांगितले. परंतु तत्कालीन कार्यकारी अभियंता हे वर्ग १ चे अधिकारी असल्यामुळे त्यांच्यावरील कारवाई संबंधिचा प्रस्ताव हा शासनाकडे सादर केलेला आहे, असेही समितीस सांगण्यात आले. या प्रकरणी साक्षीच्या वेळी सचिवांनी तत्कालीन दोन कार्यकारी अभियंते जे आता निवृत्त झाले आहेत त्याच्या संबंधीचे प्रकरण शासनाला सादर झाले असून दिनांक १४ जानेवारी, २००१ रोजी त्यांचेवर कारवाई करण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाकडून मंजुरी मिळाल्याचे सांगण्यात आले. आता चौकशी अधिकारी नेमून लवकरच या प्रकरणी कारवाई केली जाईल असेही सचिवांनी समितीसमोर प्रतिपादन केले. अफरातफर प्रकरण उघडकीस आल्यानंतर सुमारे चार वर्षांचा कालावधी लोटून गेला आहे. दरम्यानच्या काळात संबंधित कार्यकारी अभियंते आणि काही कर्मचारी देखील निवृत्त झाले आहेत. संबधित अभियंत्यांचे निवृत्तीवेतनही आता रोखून धरले असल्याचे समितीला सांगण्यात आले. अशा प्रकरणात संबंधितांवर चौकशी होण्यास विभागाकडून प्रदीर्घ विलंब लागतो. तोपर्यंत ब-याच प्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचारी निवृत्त होऊन जातात. त्यानंतर संबंधितांवर कारवाई करणे अत्यंत कठीण होऊन बसते, असे समितीचे मत आहे. अधिकारी/कर्मचा-यांच्या निवृत्तीस ४ वर्षे लोटून गेल्यास त्यांच्यावर शासकीय नियमाप्रमाणे काहीही कारवाई करता येत नाही. त्यामुळे ते कोणतीही कारवाई न होता सहीसलामत सुटून जातात असे समितीला ब-याच प्रकरणात आढळून आले आहे. त्यामुळे विभागाकडून दोषी अधिकारी/कर्मचा-यावर वेळीच कारवाई होणे अत्यंत गरजेचे आहे. त्या दृष्टीने विभागाने सतर्क राहून दोषी अधिकारी/कर्मचा-यांवर वेळीच कारवाई करावी, अशी समितीची शिफारस होती.

तसेच रुपये ३.७१ लाखाच्या शासनाच्या झालेल्या नुकसानीबाबत विचारले असता या प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचा-याकडून रक्कम वसूल करण्यासाठी कोणाकडून किती रक्कम वसूल करावी हे प्रथमत: ठरविले गेले पाहिजे असे सचिवांनी समितीसमोर प्रतिपादन केले. चौकशी अधिका-यांमार्फत कोणाकडून किती रक्कम वसूल करावी हे ठरविण्यात येऊन शासनाच्या झालेली रु. ३.७१ लाख इतक्या रकमेची वसुली सर्व संबंधितांकडून त्वरेने करण्यात यावी, अशीही समितीने शिफारस केली होती.

वर्धा जिल्हा परिषदेअंतर्गत तत्कालीन रोखपाल श्री.कुकडे यांनी ३ वर्षेपर्यंत रकमेचा अपहार केला. संबंधित लेखा अधिकारी, वित्त व लेखा अधिकारी व कार्यकारी अभियंता यांनी रकमेचा वेळीच ताळमेळ घातला असता तर रोखपालाला रकमेची अफरातफर करावयास वाव मिळाला नसता असे समितीचे मत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या प्रत्येक खाते प्रमुखांनी व वित्त व लेखा अधिका-यांनी दर महिन्याला रकमेला ताळमेळ घालावा व तसे केल्याबद्दल त्याची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय आयुक्त यांना सादर करण्यात यावी, त्या दृष्टीने विभागाने अशा प्रकारचे परिपत्रक सर्व जिल्हा परिषदांना त्वरित निर्गमित करुन त्याची एक प्रत समितीला पाठविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस होती.

"उपरोक्त शिफारशीसंदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत ग्रामविकास विभागाने असे नमूद केले की,

या प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडून खाली नमूद केल्याप्रमाणे रक्कम रु. ३.७१ लक्ष वसूल करण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

१.	श्री.एस.बी.सिंग, कार्यकारी अभियंता	रु. ३१,९८६.००
२.	श्री.ह.मो. पालीवाल, उप अभियंता	रु. ८५,०३५.३८
३.	श्री.दे.भि. पुरुषोत्तम, कार्यकारी अभियंता	रु. ६८,४५३.००
४.	श्री.मु.ज. भडांगे, स.ले.अ. (सेवानिवृत्त)	रु. १,०७,४३५.३७
५.	श्री.म.बा. बाभुळकर, स.ले.अ. (सेवानिवृत्त)	रु. ७८,०३९.००

याबाबत दिनांक १८ मार्च, २००२ च्या परिपत्रकान्वये सर्व जिल्हा परिषदांना सूचना दिलेल्या आहेत." (परिशिष्ट-अ).

तसेच समितीला दिनांक ३ मे, २००८ रोजी पुरविलेल्या लेखी माहितीत जलसंपदा विभाग व ग्रामविकास विभागाने अनुक्रमे असा खुलासा केला आहे की, "जलसंपदा विभागातील दोन अधिका-यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यात आली असून चौकशी अधिका-यांकडून चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे, सदर प्रकरण चौकशीच्या अंतिम टप्प्यात आहे."

"कै.कुकडे कनिष्ठ सहाय्यक पदी कार्यरत असतांना त्यांच्याकडे रोखपाल पदाचा कार्यभार दिलेला होता. दरम्यान त्यांनी दि. २८ ऑगस्ट, १९९७ रोजी आत्महत्या केली. त्यानंतर चौकशी अंती कै.(श्री.) कुकडे यांनी रु. ३,७०,९४८.७५ एवढ्या रक्कमेची अफरातफर केल्याचे आढळून आले. त्यामुळे सदरहू कालावधीत कार्यरत असणा-या संबंधितांविरुद्ध प्रथम अन्वेषण अहवाल (एफआयआर) दाखल करण्यात आला व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली.

अंतर्गत लेखा परीक्षा अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांच्या तपासणी अहवालाप्रमाणे कै.कुकडे यांनी दिनांक १८ मे, १९९४ ते २८ ऑगस्ट, १९९७ या कालावधीत एकूण रु. ३७०९४८.७५ ची अफरातफर केली असून त्या कालावधीत खालील कार्यकारी अभियंता व सहाय्यक लेखा अधिकारी यांच्याकडून झालेल्या अफरातफरीपैकी खालीलप्रमाणे रक्कम जिल्हा निधीमध्ये जमा करण्यात आली आहे.--

१	श्री.एम.बी. बाभुळकर, सहा, लेखा अधिकारी	..	रु. ७८,०३९
२	श्री.एस.जे. भडांगे, सहा, लेखा अधिकारी	..	रु. १,०७,४३५
३	कै.(श्री.कुकडे), कनिष्ठ सहाय्यक	..	रु. ७५,५७५
४	श्री.एस.बी.सिंग, कार्यकारी अभियंता	..	रु. ३१,९८६
	एकूण	..	रु. २,९३,०३५

श्री.ह.मो.पालीवाल, प्रभारी कार्यकारी अभियंता व श्री.डी.बी.पुरुषोत्तम, कार्यकारी अभियंता यांच्यावर अनुक्रमे रु. १,७०,०७० व रु. १५,९०० ची जबाबदारी विभागीय चौकशी निश्चित करण्यात आली आहे."

समितीला प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने सचिव ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची दिनांक ६ मे, २००८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने सचिवांना अशी विचारणा केली की दोषी असलेल्या अधिका-यांवर आपण काय कारवाई केलेली आहे. त्यावर सचिव जलसंधारण विभाग यांनी असे सांगितले की, या प्रकरणात चार अधिकारी दोषी आढळून आलेले असून श्री.एस.बी.सिंग यांच्याकडून ३२ हजार रुपये वसूल करण्यात आलेले असून श्री.एस.जे.भडांगे, सहाय्यक लेखा अधिकारी यांच्याकडून १,०७,४३५ रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. कनिष्ठ सहाय्यक कै.कुकडे यांच्याकडून ७५ हजार रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. श्री.बाभुळकर, सहाय्यक लेखा अधिकारी यांच्याकडून ७८ हजार रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. दुसरे कार्यकारी अभियंता श्री.पुरुषोत्तम यांची विभागीय चौकशी पूर्ण झालेली नाही. असे एकूण ३ लक्ष रुपयांपैकी २.९३ लक्ष रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. कै.कुकडे, कनिष्ठ सहाय्यक पदी कार्यरत असताना त्यांच्याकडे रोखपाल पदाचा कार्यभार दिलेला होता. चौकशी अंती श्री.कुकडे यांनी ३,७०,९४८ एवढ्या रक्कमेची अफरातफर केल्याचे सिद्ध झालेले आहे व त्या कालावधीत कार्यकारी अभियंता व सहाय्यक लेखा अधिकारी यांच्याकडून वरील प्रमाणे रक्कमा वसूल करण्यात आलेल्या आहेत. तसेच श्री.पालीवाल, प्रभारी कार्यकारी अभियंता व श्री.पुरुषोत्तम, कार्यकारी अभियंता यांच्यावर अनुक्रमे रु.१.७० लक्ष व १५,९०० रुपयांची जबाबदारी विभागीय चौकशीत निश्चित करण्यात आलेली आहे.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, चौकशीस सुरुवात कधी करण्यात आली होती. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वर्धा यांनी समितीला असे सांगितले की, चौकशी २००१ मध्ये सुरु करण्यात आली होती. या प्रकरणात फेर चौकशी करण्यात आली व त्याचा चौकशी अहवाल ऑक्टोबर, २००७ मध्ये प्राप्त झाला. परंतु कागदपत्र न्यायालयात असल्यामुळे विलंब झालेला आहे. या अधिका-यांविरुद्ध एफआयआर २००४ मध्ये दाखल केला होता. तसेच सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला असे सांगितले की, संबंधित प्रकरणाबाबत चौकशी अहवाल पूर्ण झालेला असून हे अधिकारी जलसंपदा विभागात काम करीत असल्यामुळे जलसंपदा विभागाकडून अभिप्राय आल्यानंतर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून अभिप्राय मागवून कारवाई करण्यात येईल. त्यावर सचिव, जलसंधारण यांनी असे सांगितले की, सदर प्रकरणी ए महिन्याच्या आत कारवाई पूर्ण केली जाईल. दुसरे अधिकारी सेवानिवृत्त झालेले आहेत. सेवानिवृत्तीच्या वेळेस चार्जशिट ठेवली गेली नाही तर आपल्याला पेन्शन थांबवता येत नाही.

परंतु यासंदर्भातील पैसे हायकोर्टात डिपॉझीट करण्यात आलेले आहेत. या प्रकरणात आपल्याला महाराष्ट्र लोकसेवा आयोगापर्यंत जावे लागणार असल्यामुळे एक महिन्याचा कालावधी कारवाई करण्यासाठी लागेल.

अभिप्राय व शिफारशी :

वर्धा जिल्हा परिषदेत झालेल्या रकमेच्या अपहारामुळे शासनाचे रुपये ३.७१ लाखाचे नुकसान झाल्यामुळे या संपूर्ण गैरव्यवहारास जबाबदार असणा-या सर्व संबंधित अधिका-यांकडून शासनाच्या झालेल्या रु.३.७१ लाख इतक्या रकमेची वसुली त्वरित करण्याबाबतची शिफारस करण्यात आली होती, तसेच संबंधित लेखा अधिका-यांनी वेळीच ताळमेळ घातला असता तर रोखपालास रकमेचा अपहार करावयास वाव मिळाला नसता. सबब, याबाबत विभागाने परिपत्रक काढून दर महिन्याच्या रकमेचा ताळमेळ घालून त्याची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय आयुक्तांना सादर करावी, अशी देखील शिफारस केली होती. **विभागाकडून याबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आल्याचे तसेच संबंधितांकडून काही रक्कम वसूल झाल्याचे प्राप्त झालेल्या माहितीवरुन दिसून आले तसेच सचिवांच्या साक्षीत देखील शिफारशीसंदर्भात विभागाने समितीने केलेल्या शिफारशींवर कार्यवाही केल्याचे दिसून आल्यामुळे समितीने समाधान व्यक्त केले.**

तथापि, साक्षीच्या वेळ आश्वासित करण्यात आल्याप्रमाणे संबंधित दोषी अधिका-यांविरुद्ध काय कारवाई करण्यात आली याबाबतची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावी, अशी समितीची आग्रही शिफारस आहे.

(४) ग्रामीण स्वच्छता योजनेंतर्गत शौचालयांचे बांधकामावरील खर्च. (जिल्हा परिषद लातूर)(३.२२)

शासनाने ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्य चांगले रहावे यासाठी शौचालयाच्या बांधकामाचा कार्यक्रम हाती घेतला. या योजनेमागे घर तैथे शौचालय अशी शासनाची संकल्पना होती. सन १९९६-९७ साली लातूर जिल्हा परिषदेने शौचालयाच्या बांधकामाचा प्रसार व प्रचार करुन धडक कार्यक्रम हाती घेतला. शासनाने १२,९९० इतक्या शौचालयांचे उद्दिष्ट लातूर जिल्हा परिषदेला दिले होते. जिल्हा परिषदेने उद्दिष्टापेक्षा जास्त म्हणजे १५,२७८ शौचालये बांधली. शौचालयाच्या बांधकामासाठी जिल्हा परिषदेला रु. ३.७३ लाखाचा निधी प्राप्त झाला होता. उक्त निधीपैकी रु.२.७३ लाख इतका खर्च शौचालयाच्या बांधकामावर करण्यात आला. समितीने या योजनेचा लाभ सर्व लाभार्थ्यांना देण्यात आला किंवा कसे अशी विचारणा केली असता समितला असे सांगण्यात आले की, ४,३८५ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला नाही. ४,३८५ इतक्या लाभार्थ्यांना या योजनेच्या लाभापासून वंचित ठेवण्याची कारणे सचिवांनी विचारली असता समितीला सांगण्यात आले की, लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत अमुक एक रक्कम दिली जाईल, असे सांगण्यात आले नव्हते. लाभार्थ्यांकडून रक्कम त्यांचा हक्क म्हणून मिळणार नाही असे हमीपत्र घेतले गेले होते. वस्तुत: शौचालय बांधण्याच्या योजना केंद्र आणि राज्य शासन पुरस्कृत आहेत. केंद्र शासन पुरस्कृत योजनेअंतर्गत केंद्र शासनाचे रु. १,०००, राज्य शासनाचे १,५००, जिल्हा परिषदेचे रु. १,००० आणि लाभार्थ्यांचे रु.५०० असे एकंदर रुपये ४,००० ची तरतूद करण्यात येते. राज्य पुरस्कृत योजनेअंतर्गत राज्य शासनाचे रु. २,५००, जिल्हा परिषदेचे रु. १,००० व लाभार्थ्याचे रु. ५०० अशा प्रकारे रु.४,००० ची तरतूद या योजनेअंतर्गत आहे. शौचालय बांधण्याच्या योजनेअंतर्गतची ही तरतूद पाहता सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी लाभार्थ्यांना हक्क म्हणून रक्कम मिळेलच असे नाही व तद्नुसार लाभार्थ्यांकडून तसे हमीपत्र घेण्यात आले होते हे समितीसमोर केलेले प्रतिपादन समितीस पटण्यासारखे नाही. त्यामुळे लातूर जिल्हा परिषदेने सन १९९६-९७ मध्ये शौचालय बांधकामाच्या योजनेअंतर्गत ज्या ४,३८५ लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यापासून वंचित ठेवले त्या लाभार्थ्यांना ही रक्कम तीन महिन्यांत प्रदान करण्यात यावी, अशी समितीने आग्रहाची शिफारस केली होती.

लातूर जिल्हा परिषदेने उद्दिष्टापेक्षा जास्त शौचालये बांधली. जिल्हा परिषदेकडे या योजनेअंतर्गत किती निधीची तरतूद आहे याकडे नियोजन करताना जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने लक्ष दिले नाही. योजनेचा मोठ्या प्रमाणावर प्रसार व प्रचार केला गेला. त्यामुळे उद्दिष्टांपेक्षा जास्त प्रमाणात शौचालयाचे बांधकाम झाले. उद्दिष्ट गाठण्यासाठी किंवा जास्त काम करुन दाखविण्यासाठी घाईगर्दीने शौचालयाचे बांधकाम करण्यात आले. शौचालयाचा बांधकामाचा दर्जा अतिशय निकृष्ट असून त्यांचा वापर फार कमी प्रमाणात होत असल्याचे समितीला प्रत्यक्ष पाहणीमध्ये दिसून आले. काही ठिकाणी तर शौचालयाचा वापर स्नानगृह, सरपण ठेवणे वा आडगळीच्या वस्तू ठेवण्यासाठी केला जात आहे. असेही समितीला आढळून आले. उद्दिष्टापेक्षा जास्त शौचालये बांधण्यात आली त्याबाबतची कार्योत्तर मंजूरी प्रदीर्घ विलंबाने म्हणजे दिनांक २४ जून, १९९९ रोजी घेण्यात आली. यावरुन योजना राबविताना आवश्यक असलेले नियोजन करण्यात जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने आवश्यक तेवढे लक्ष दिले नाही असा निष्कर्ष समितीला खेदाने काढावा लागत आहे. भावी काळात तरी जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने योजना राबविताना योजनेसाठी आवश्यक असणारे संपूर्ण नियोजन वेळीच करावे, अशी समितीची सूचना आहे.

सन १९९६-९७ साली लातूर जिल्हा परिषदेने बांधलेल्या शौचालयाचा दर्जा तपासण्यासाठी भंडारा जिल्हा परिषदेतील उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), उप अभियंता व ४ कनिष्ठ अभियंत्यांची नियुक्ती करुन त्यांना शौचालयाच्या बांधकामाचा दर्जासंबंधीचा अहवाल शासनास सादर करण्यास सांगितले होते. दरम्यानच्या काळात लातूर जिल्हा परिषदेने तथा शासनाने भंडारा जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना सुमारे ३-४ स्मरणपत्रे पाठवून उक्त तपासणी करण्याचे आदेश दिले. समितीने लातूर जिल्हा परिषदेच्या भेटीच्या वेळी भंडारा जिल्हा परिषदेच्या नियुक्त केलेल्या अधिका-यांनी शौचालयाच्या बांधकामाची तपासणी केली आहे काय असे विचारले असता, अद्यापही शौचालयाच्या बांधकामाची तपासणी करण्यात आली नाही, असे मुख्य कार्यकारी अधिका-यांनी समितीस सांगितले. याप्रकरणी दिनांक ३१ जानेवारी, २००१ रोजी समितीने सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांची साक्ष घेतली. सचिवांनी अद्याप शौचालयाच्या बांधकामाची तपासणी करण्यात आली नसल्याबद्दल समितीला सांगितले. वस्तुत: शासनाने जून, १९९७ मध्ये भंडारा जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) तसेच उप अभियंता आणि ४ कनिष्ठ अभियंत्यांना तपासणी करण्याबाबत आदेश देऊनही जानेवारी, २००१ पर्यंत शौचालयाच्या

बांधकामाची तपासणी संबंधितांनी शासनाकडून तसेच लातूर जिल्हा परिषदेकडून वारंवार स्मरणपत्रे पाठवूनही केली नाही. सचिवांनी भंडारा जिल्हा परिषदेअंतर्गत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) हे पद सुमारे ६-७ महिने रिक्त होते व दुस-या अधिका-यास हे काम सोपविण्यात आले होते असे सांगितले. शासनाने १९९७ मध्ये शौचालयाच्या बांधकामाच्या तपासणीचे आदेश देऊनही जानेवारी, २००१ पर्यंत सुमारे ४ वर्षे पर्यंत संबंधित अधिका-यांनी शासनाचे आदेश असतानाही तपासणी केली नाही ही बाब समितीच्या मते अतिशय गंभीर आहे. शासनाचे आदेश न जुमानणा-या संबंधित अधिका-यांवर काय कारवाई करण्यात येईल, असे समितीने विचारले असता संबंधितांकडून याबाबतचे स्पष्टीकरण घेण्यात येईल, असे सचिवांनी समितीस सांगितले. शासनाच्या आदेशाचे पालन न करणा-या भंडारा जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिका-याचे स्पष्टीकरण घेऊन चौकशीअंती त्यांचेवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस होती.

"तसेच राज्यातील जिल्हा परिषदांनी बांधलेल्या शौचालयाच्या बांधकामाचा दर्जा तपासण्यासाठी एकंदर ३३ समित्या स्थापन केल्याचे विभागीय प्रतिनिधीनी समितीस सांगितले. नेमलेल्या या ३३ समित्यांनी जिल्हा परिषदेंतर्गत बांधलेल्या शौचालयाच्या बांधकामाचा दर्जा तपासून त्याचा अहवाल विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर या संबंधिचा एकत्रित अहवाल समितीस ६ महिन्यात सादर करण्यात यावा, अशी ही समितीची शिफारस होती."

उपरोक्त शिफारशीसंदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने सादर केलेल्या लेखी माहितीत खालीलप्रमाणे खुलासा केला -

योजना नवीन असल्यामुळे उद्दिष्टांपेक्षा जादा शौचालयांचे बांधकाम झाले होते. त्यामुळे ४३६४ लाभार्थ्यांना मुदतीत रक्कम अदा करता आली नाही. परंतु समितीच्या शिफारशीनुसार शासनाने क्षेत्रीय कार्यालयांना दिलेल्या सूचनेप्रमाणे सर्व लाभधारकांना सन १९९७-९८ मध्ये रक्कम अदा केलेली आहे.

लातूर जिल्हा परिषदेच्या सन १९९६-९७ च्या लेख्यावरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालासंबंधीच्या पाचव्या अहवालातील शिफारशीबाबत ग्राम स्वच्छता कार्यक्रमांतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयाची तपासणी लातूर येथे जाऊन करण्याबाबत श्री.ए.डी.लोखंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हापरिषद, भंडारा यांना सूचना दिल्या होत्या. परंतु त्यांनी ते काम विहित कालावधीत पूर्ण न केल्यामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची शिफारस पंचायती राज समितीने केलेली आहे. यासंदर्भात श्री.ए.डी.लोखंडे यांच्यावर दोषारोपपत्र बजावून कारणे दाखवा नोटीसा देण्यात आलेली होती. त्यांच्याकडून प्राप्त झालेला खुलासा समर्थनीस नसल्यामुळे

त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव ग्राम विकास विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेला आहे. राज्यातील जिल्हा परिषदांनी बांधलेल्या शौचालयांचा दर्जा तपासून त्या संबंधिचा अहवाल शासनाकडे २९ जिल्हा परिषदेच्या २९ समित्यांकडून प्राप्त झाला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने एकत्रित अहवाल तयार केलेला आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे. (परिशिष्ट)

ग्रामविकास व जलसंधारण विभागाने समितीला सादर केलेल्या माहितीत खालीलप्रमाणे खुलासा केली---

प्रस्तुत प्रकरणी श्री.ए.डी.लोखंडे, तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, भंडारा यांना यासंदर्भात क्रमांक : मविसे ७९९९/प्र.क्र.१४४३/आ-२,दिनांक २३ जानेवारी २००४ च्या ज्ञापनान्वये दोषारोपपत्रे बजवण्यात आली असून, त्यांचेवरील दोषारोपांची चौकशी करण्यासाठी क्रमांक मविसे ७९९९/प्र.क्र.१४४३/आ-२, दिनांक ७ नोव्हेंबर २००६ च्या आदेशान्वये उपायुक्त (विकास) विभागीय आयुक्तांचे कार्यालय, नागपूर यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार चौकशी अधिकाऱ्यांनी सुनावणी पूर्ण केली असून विभागीय चौकशी अंतिम टप्प्यावर आहे व त्याबाबतचा अहवाल ते लवकरच शासनास पाठविणार आहेत, असे त्यांनी कळविले आहे.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने प्रधान सचिव पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी असा खुलासा केला की, या प्रश्नासंदर्भात समितीने ३ मुद्दे उपस्थित केले होते. लातूर जिल्हा परिषदेने सन १९९६-९७ मध्ये शौचालय बांधकामाच्या योजनेंतर्गत ४३८५ लाभार्थ्यांना लाभ देण्यापासून वंचित ठेवले होते.

त्यामुळे सदर लाभार्थ्यांना ३ महिन्यांत रक्कम प्रदान करण्याच्या संदर्भात शिफारस केली होती. सदर योजना त्या वर्षी नवीन असल्याने उद्दिष्टांपेक्षा जादा शौचालयाचे बांधकाम झाले होते. त्यामुळे ४३८५ लाभार्थ्यांना मुदतीत रक्कम अदा करता आली नाही. परंतु समितीच्या शिफारशीनुसार सर्व लाभार्थ्यांना सन १९९७-९८ मध्ये रक्कम अदा केलेली आहे. लातूर जिल्हा परिषदेच्या सन १९९६-९७ च्या लेख्यावरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालासंबंधी पाचव्या अहवालातील शिफारशीबाबत ग्राम स्वच्छता कार्यक्रमांतर्गत लातूर जिल्ह्यात बांधण्यात आलेल्या शौचालयाची तपासणी लातूर जिल्ह्यात जाऊन करण्याबाबत श्री.लोखंडे तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद भंडारा यांना सूचना दिल्या होत्या. परंतु त्यांनी ते काम विहित कालावधीत पूर्ण न केल्यामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची शिफारस समितीने केलेली होती. यासंदर्भात श्री.लोखंडे यांच्यावर दोषारोपपत्र बजावून कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली होती. याबाबत श्री.लोखंडे यांकडून प्राप्त झालेला खुलासा समर्थनीय नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द ग्रामविकास विभागामार्फत विभागीय चौकशी सुरू केलेली असून सदर चौकशी अंतिम टप्प्यात आहे.

तसेच सन १९९६-९७ मध्ये महाराष्ट्रात २९ जिल्हा परिषदा होत्या व समितीने केलेल्या शिफारशीनुसार राज्यातील २९ जिल्हा परिषदांनी बांधलेल्या शौचालयाचा दर्जा तपासून त्यासंबंधीचा

अहवाल २९ जिल्हा परिषदेच्या २९ समित्यांकडून प्राप्त झाला असून सदर अहवालाच्या अनुषंगाने एकत्रित अहवाल तयार केलेला आहे.

अभिप्राय व शिफारशी :

लातूर जिल्हापरिषदेने सन १९९६-९७ मध्ये शौचालय बांधकामाच्या योजनेअंतर्गत ज्या ४३८५ लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यापासून वंचित ठेवले त्यांना सदर रक्कम प्रदान करण्यात यावी. शासनाच्या आदेशाचे पालन न करणा-या भंडारा जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिका-यांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी तसेच राज्यात जिल्हापरिषदांनी बांधलेल्या शौचालयाचा दर्जा तपासून त्यासंबंधीचा एकत्रित अहवाल समितीस सादर करण्यात यावा अशा प्रामुख्याने तीन शिफारशी अहवालात करण्यात आल्या होत्या. विभागाकडून प्राप्त झालेली माहिती तसेच सचिवांनी साक्षीच्या वेळी प्रत्यक्षात सांगितलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, **समितीने केलेल्या तीन शिफारशींवर विभागाकडून कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून आले त्यामुळे समितीने समाधान व्यक्त केले आहे. तथापि शासनाच्या आदेशाचे पालन न करणा-या अधिका-यावर अद्यापपर्यंत अंतिम कारवाई करण्यात आली नाही. सदर प्रकरणास जवळपास दहा वर्षाचा कालावधी लोटला आहे. तसेच समितीचा अहवाल सभागृहात सन २००१ मध्ये सादर करण्यात आला आहे. परंतु अद्यापपर्यंत फक्त चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे व चौकशी अंतिम टप्प्यात आहे असे सांगण्यात आले, त्यामुळे सदर प्रकरणी दिरंगाई झालेली दिसून येते. सबब सदर चौकशी अहवाल लवकरात लवकर प्राप्त करुन घेऊन संबंधितांवर केलेल्या कारवाई बाबतची माहिती समितीला पाठविण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

(५) मागासविकास गटातील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य वाटपाबाबत : जिल्हा परिषद लातूर (३.५७)

सन १९९६-९७ मध्ये लातूर जिल्हा परिषदे अंतर्गत मागास विकास गटातील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरविण्यासाठी रुपये ३० हजाराच्या खरेदीला मान्यता घेण्यात आली. प्रत्यक्षात मात्र रुपये २.८७ लाखाची खरेदी करण्यात आली. रुपये ३० हजारावरील खरेदीला मुख्य कार्यकारी

अधिकारी, शिक्षण समिती अथवा जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता नव्हती. रुपये २.८७ लाखाची लेखन साहित्याची खरेदी करुन खरेदीला मान्यता आहे अथवा नाही हे न पाहता पुरवठादारास अंतिम देयकेही प्रदान करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिका-यांनी केलेल्या अनियमिततेबाबत काय कारवाई करण्यात आली असे विचारले असता या प्रकरणी प्रामुख्याने तत्कालीन वित्त व लेखा अधिकारी व प्राथमिक शिक्षण अधिकारी जबाबदार असल्याचे समितीस सांगण्यात आले. या दोन वरिष्ठ अधिका-यांसह जिल्हा परिषदेचे जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांचेवर देखील विभागीय कारवाई प्रस्तावित करण्यात आल्याचे समितीला सांगण्यात आले.

सचिवांनी समितीस सांगितल्याप्रमाणे या प्रकरणी तत्कालीन वित्त व लेखा अधिकारी, प्राथमिक शिक्षण अधिकारी व जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिका-यांची एक महिन्यात चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस त्वरित पाठविण्यात यावा.

उपरोक्त शिफारशी संदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत वित्त विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

"जिल्हा परिषद, लातूर येथे ऑपरेशन ब्लॅकबोर्ड या योजनेअंतर्गत सन १९९६-९७ मध्ये खरेदी केलेल्या शालेय साहित्य खरेदीमधील गैरव्यवहाराबाबत तत्कालीन मुख्य लेखा वित्त अधिकारी यांच्याविरुद्ध काही ठोस दोषारोप तयार करणे शक्य नसल्याने, त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही असा निर्णय शासनाने घेतला आहे."

तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागाने खालीलप्रमाणे लेखी खुलासा केला -

"समितीने शिफारस केल्याप्रमाणे लेखा व वित्त अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्रा.) यांच्याविरुद्ध कार्यवाहीसाठी त्यांचे खाते प्रमुखाकडे प्रस्ताव सादर केले असून जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिका-यांवर प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली आहे."

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांन असा खुलासा केला की, सन १९९६-९७ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद, लातूर यांनी इयत्ता पहिलीतील २०,५७३ विद्यार्थ्यांना सन १९९६-९७ या वित्तीय वर्षाकरिता मोफत लेखन साहित्य व गणवेष पुरवठा करण्यासाठी रक्कम रु. २,८६,९९३/- इतका खर्च करताना स्थायी समितीची मान्यता न घेता खर्च करण्यात आलेला असल्यामुळे तत्कालीन वित्त व लेखा अधिकारी, प्राथमिक शिक्षण अधिकारी व जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिका-यांची एक महिन्यात चौकशी करुन कारवाई करण्याबाबत समितीने शिफारस केली होती. परंतु १९९६-९७ मध्ये लातूर जिल्हा परिषदेवर प्रशासक नेमला होता त्यांनी या फाईलवर सही केलेली होती त्यामुळे

या अधिका-यांवर कारवाई करण्याचा प्रश्न येत नाही. तसेच जिल्हा परिषदेच्या ४ कर्मचा-यांवर सुद्धा अशाच प्रकारचे आरोप ठेवण्यात आलेले होते त्यांच्यासंदर्भात विभागीय चौकशी करण्यात आली होती, परंतु विभागीय चौकशीमध्ये त्यांनासुद्धा निर्दोष ठरवण्यात आलेले आहे.

त्यावर समितीने वित्त विभागाची शिफारस आणि ग्रामविकास विभागाची कारवाई यांच्यामध्ये फरक आहे त्यामुळे याबाबतीत खुलासा करावा. अशी विचारणा केली असता त्यावर प्रधान सचिव,

ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, यामध्ये दोन प्रकारचे अधिकार आहेत. मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे राज्यस्तरावरील अधिकारी आहेत तर शिक्षण अधिकारी हे जिल्हा परिषदेच्या स्तरावरील अधिकारी आहेत. मुख्य लेखा व वित्त अधिकारीच्या बाबतीत स्थायी समितींची मान्यता न घेता खर्च करण्यात आलेला आहे. असा ठपका ठेवण्यात आला होता. परंतु वित्त विभागाने खुलासा केलेला आहे की, त्या काळात लातूर जिल्हा परिषदेमध्ये आचारसंहिता लागू होती त्यामुळे खर्चाला मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात आली होती. त्यामुळे मुख्य लेखा व वित्त अधिका-यावर जो ठपका ठेवला होता तो निकाली निघालेला आहे. तसेच शिक्षण अधिका-यावर जो ठपका होता तो सुद्धा निकाली निघालेला आहे. जिल्हापरिषदेच्या चतुर्थ श्रेणीमधील ४ कर्मचा-यांवर सुद्धा ठपका ठेवण्यात आला होता. परंतु त्यांनासुद्धा निर्दोष सोडण्यात आलेले आहे. लेखन साहित्याच्या खरेदीच्या संदर्भात तत्कालीन सहाय्यक लेखा अधिकारी, श्री.कुलकर्णी यांच्यावर कारवाई करण्यात आली असून त्यांची एक वेतनवाढ कमी करण्यात आलेली आहे.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, १९९६-९७ मध्ये मागास विकास गटातील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरविण्याच्या संदर्भात फक्त रुपये ३० हजाराच्या खरेदीस जिल्हा परिषदेची मान्यता असताना रुपये २.८७ लक्ष रुपयांची खरेदी कशी करण्यात आली. त्यावर सचिव, शालेय शिक्षण यांनी असा खुलासा केला की, जिल्हा परिषद बरखास्त केलेली नव्हती. साहित्य खरेदीचे आदेश घेतले होते. समितीने पुढे अशी विचारणा केली की, साहित्य खरेदीची एवढी तातडी होती काय, याबाबत सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी असे सांगितले की, शैक्षणिक साहित्य खरेदीचा प्रश्न होता. शैक्षणिक बाब असल्यामुळे वेळेवर खरेदी करणे आवश्यक होते. पूर्वीची ३० हजार रुपयांची खरेदी होती. त्यानंतर २ लाख ८७ हजाराची खरेदी करण्यात आली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, तांत्रिक मार्ग काढून खरेदीचे समर्थन केले जात आहे. आचारसंहिता असल्यामुळे जिल्हापरिषदेच्या पदाधिका-यांना बोलविण्यात आले नाही. पण मुख्य कार्यकारी अधिका-यांनी याबाबत बैठक घेतली होती काय. विभाग प्रमुखांना बैठकीत बोलविण्यात

आले होते काय. त्यावर सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी असे सांगितले की, शिक्षण खात्याने आदेश दिलेले आहेत. याबाबतीत महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता अनुसार महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक १३ फेब्रुवारी, १९९७ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वित्तीय अधिकार आणि इतर सर्व अधिकार आचारसंहितेमध्ये लागू करता येतील. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, रक्कम रुपये २,८६,९९३ चे लेखन सामुग्री खरेदीस मुख्य लेखा व वित्त अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात आलेली नाही. एका विशिष्ट पुरवठादारास लाभ देण्याचा हेतू आहे

असे दिसून येतो असा लेखा परिक्षकांचा आक्षेप आहे. परंतु पंचायती राज समिती गेल्यामुळे या सर्व बाबी निदर्शनास आल्या. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांनी असे सांगितले की, शिक्षणाधिका-यांनी या संदर्भात दिनांक २७-०२-१९९७ रोजी टिप्पणी सादर केली होती त्यानंतर वित्त विभागाकडे टिप्पणी गेल्यावर त्यावर मुख्य लेखा व वित्त अधिका-यांची सही आहे. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिका-यांनी ५ मार्च १९९७ रोजी सही केली आहे त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, मान्यता घेतली होती तर लेखापरिक्षणात परिच्छेद का घेण्यात आला, लेखा परिक्षणाच्या वेळी मान्यता घेण्यात आल्याचे कागदपत्र लेखा परिक्षकाला दाखविले नसतील किंवा अधिका-यांच्या सह्या नंतर घेण्यात आल्या असतील. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी असा खुलासा केला की, मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे नस्ती येतात त्यांची आवक-जावक नोंदवहीमध्ये नोंद केली जाते. ही जी नस्ती मुख्य कार्यकारी अधिका-याकडे आली होती त्याचा आवक क्रमांक १९९६/५ मार्च १९९७ असा आहे. त्यावर समितीने असे मत व्यक्त केले की, लेखापरिक्षकाला खुलासा दिला असता तर कदाचित लेखा परिच्छेद आला नसता. त्यावर प्रधान सचिव, ग्रामविकास यांनी असा खुलासा केला हाफ मार्जिन पॅराचे वेळेवर उत्तर दिले नाही तर असे परिच्छेद येतात. मोठ्या प्रमाणात लेखा परिक्षणात परिच्छेद आला तरी समाधानकारक उत्तरे दिली जातात. त्यानंतर परिच्छेद वगळला जातो. यामध्ये एकच मुद्दा असा दिसतो की, उत्तरामध्ये तफावत आढळून आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी त्यावेळेच्या मुख्य लेखा व वित्त अधिका-यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करुन याबाबत अहवाल तयार करु शकतात. शिक्षण सचिवांनी निष्कर्ष काढलेला आहे आणि समितीपुढे जे उत्तर आलेले आहे ते योग्य वाटते. त्यावेळी गैरसमजुतीमधून व्यवस्थित उत्तर देण्यात आलेले नाही असे दिसते. याप्रकरणामध्ये कोणी जबाबदार नाही असे सांगण्यात आले. चौकशी केल्यानंतर सुद्धा कोणालाही जबाबदार धरण्यात आलेले नाही.

यावर समितीने असे निदेश की, यासंबंधी मुख्य कार्यकारी अधिका-यांकडून अहवाल मागविण्यात यावा.

त्यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी असे सांगितले की, यामध्ये दोन मुद्दे आहेत. पूर्वी जे अभिप्राय देण्यात आलेले आहेत त्या अभिप्रायाबाबत सखोल चौकशी केल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिलेली आहे. यामध्ये कोणतीही व्यक्ती दोषी नाही असे जे निष्कर्ष

काढण्यात आलेले आहेत ते कसे योग्य आहेत याबद्दल सखोल अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी १५ दिवसात तयार करतील आणि सादर करतील.

समितीने दिलेल्या निदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालील सखोल चौकशीचा अहवाल दिनांक १० जुलै २००८ रोजीच्या पत्रान्वये पाठविला आहे.

१. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, दिनांक १४ ऑक्टोबर १९९६ नुसार जि.प. च्या प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली तील १०३ मागास विकास गटातील सर्व लाभार्थ्यांना सन १९९६-९७ या वर्षापासून गणवेष व लेखन साहित्य पुरवठा कारणेस्तव लातूर जिल्हा परिषदेला एकूण रु. ३७.३५ लक्ष तरतूद प्राप्त झाली होती. त्यापैकी रु.

२,८७,०००/- चे लेखन साहित्य जाहिर प्रसिध्दीद्वारे दर मागवून खरेदी करण्यासाठी जि.प. सर्वसाधारण सभा दिनांक १३ नोव्हेंबर १९९६, ठराव क्र.८६३ नुसार मान्यता दिलेली आहे.

२. साप्ताहिक विचार स्वातंत्र, लातूर व साप्ताहिक हाक, लातूर या वृत्तपत्रात अंदाजित किंमत रु.३०,०००/- जाहिरात देऊन मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये मे.मॅप स्कॅप कार्पो., सोलापूर यांचे दर सर्वात कमी असल्याने त्यांचे दरास मंजुरी देऊन दर निश्चित करण्यात आले होते. मंजुर केलेले दर पुढीलप्रमाणे होते-(१)दगडी पाटी ९इंच x ११इंच लाकडी फ्रेम रु.९.७० प्रति नग (२)पेन्सिल पुडा रु.४.२५ प्रति नग.

३. खरेदी प्रक्रियेच्या काळात आचारसंहिता असल्यामुळे महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक १३ डिसेंबर १९९७ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना (प्रशासक म्हणून) वित्तीय अधिकारी व तद्नुषंगिक इतर सर्व अधिकार प्रदान करण्यात आले होते. त्यामुळे उपरोक्त प्रमाणे निश्चीत केलेल्या दरानुसार पुरवठा आदेश क्र. १९११-९६-९७,दिनांक ०५ मार्च १९९७ रु. २,८६,९९३, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने निर्गमित केले आहे. त्याप्रमाणे पुरवठा झालेला आहे.

४. सदर प्रकरणी पंचायत राज समितीने दोषी अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी प्रस्तावित करण्याबाबत सुचविल्याप्रमाणे जि.प.मधील संबंधित चार कर्मचाऱ्यांबाबत सहाय्यक आयुक्त (चौकशी), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असता संबंधित चार कर्मचारी निर्दोष असल्याबाबत कळविले आहे.

५. तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, श्री.एस.एल.धवन यांचे विरुध्द शासन पत्र क्र.सं.ले.को.१४९९/प्र.क्र.८०/९८/कोषा-प्रशा-१, दिनांक १२ एप्रिल २००२ अन्वये यांचे विरुध्द काही ठोस दोषारोप तयार करणे शक्य होत नसल्याने श्री.धवन यांचे विरुध्द विभागीय चौकशीच्या कारवाईची आवश्यकता नाही असा निर्णय शासनाने घेतला असलेबाबत सचिव (ले व को),वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे अशा पत्र क्र. पंरास-११.०१/प्र.क्र.-११९/०१/कोषा (प्र.-१), दिनांक २४ फेब्रुवारी २००५ अन्वये कळविण्यात आले आहे.

उपरोक्तप्रमाणे खरेदीस प्रशासकीय मंजुरी, वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन मान्यता व पुरवठा आदेश सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने निर्गमित केलेले आहेत. त्यामुळे चौकशी अधिकाऱ्याने संबंधित कर्मचारी /अधिकारी यांना निर्दोष घोषित केल्याचे दिसून येते.

अभिप्राय व शिफारशी :-

सन १९९६-९७ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद, लातूर यांनी इयत्ता पहिलीतील २०,५७३ विद्यार्थ्यांना मोफत लेखन साहित्य व गणवेश पुरवठा करण्यासाठी रक्कम रु.२,८६,९९३ इतका खर्च स्थायी समितीची मान्यता न घेता केला. त्यामुळे सदर प्रकरणी झालेल्या अनियमिततेबाबत, जिल्हा परिषदेचे तत्कालीन लेखा व वित्त अधिकारी तसेच प्राथमिक शिक्षण अधिकारी जबाबदार असल्याने त्यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे प्रस्तावित केल्याचे समितीस सांगितले व त्या

अनुषंगाने समितीने संबंधितांवर कारवाई करुन त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस पाठविण्याबाबत शिफारस केली होती. परंतु सचिवांच्या साक्षीच्या बैठकीत समोर आलेली वस्तुस्थिती लक्षात घेता असे दिसून आले की, सदर कालावधीत आचारसंहिता असल्यामुळे खर्चाला मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची मान्यता घेण्यात आली होती. परंतु सदर प्रकरणी खरेदी करण्यात आलेल्या साहित्यास मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच लेखा व वित्त अधिकारी यांची मान्यता घेण्यात आली नाही. त्यामुळे विशिष्ट पुरवठादाराचा लाभ व्हावा असा हेतू दिसून येतो असे लेखा परिक्षकांचे आक्षेप होते. मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच लेखा व वित्त अधिकारी यांची सदर खरेदीस मान्यता घेण्यात आल्याची बाब त्याचवेळी निदर्शनास आणली असती तर सदर परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात आला नसता. त्यामुळे समितीचे जे पूर्वीचे अभिप्राय आहेत त्याबाबत सखोल चौकशी करण्यात यावी व सदर प्रकरणी कोणतीही व्यक्ती दोषी नाही असा जो निष्कर्ष काढण्यात आला आहे तो कसा योग्य आहे याबाबतचा सखोल अहवाल समितीला पाठविण्याबाबत निदेश दिले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या सखोल चौकशीवरुन असे दिसून येते की, सदर खरेदीस प्रशासकीय मान्यता घेवून त्यास वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्यात आली होती व सर्वात कमी असलेल्या दरास मंजुरी देवून दर निश्चित केले होते. सदर कालावधीत आचारसंहिता लागू असल्याने खरेदीच्या दरपत्रकास व पुरवठा आदेशास सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजुरीने निर्गमित करण्यात आले होते. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना निर्दोष करण्यात आले.

लेखा परिच्छेदातील आक्षेप व त्यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेली माहिती, सचिवांनी साक्षीच्या वेळी दिलेली माहिती तसेच समितीने दिलेल्या निदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेला सखोल चौकशी अहवाल यावरुन असे दिसून येते की, **जिल्हा परिषदेने या सर्व बाबीचा खुलासा लेखा परिक्षण दरम्यान करणे आवश्यक होते. परंतु जिल्हा परिषदेने लेखा आक्षेपा संदर्भातील खुलासा वेळीच न केल्यामुळे सदर आक्षेप अहवालात समाविष्ट झाला आहे. समितीला पुन्हा एकदा खेदाने नमूद करावेसे वाटते की, यापूर्वी देखील समितीच्या अहवालात लेखा परिक्षणाच्या लेखा आक्षेपा**

संदर्भात वेळच्या वेळी पूर्तता करण्याबाबत शिफारस करण्यात आली होती, तथापि, पुन्हा त्याच संदर्भात सदर परिच्छेदाच्या अनुषंगाने समिती अशी शिफारस करते की, लेखा परिक्षणाच्या वेळी योग्य ती माहिती देण्यात येत नाही. तसेच लेखा परिक्षकांमार्फत देण्यात येणाऱ्या विहित कालावधीत देखील आक्षेपा संदर्भातील कागदपत्राची पूर्तता करण्यात येत नाही, त्यामुळे असे आक्षेप लेखा परिक्षण अहवालात येतात. जिल्हा परिषदांकडून लेखा आक्षेपासंदर्भात देण्यात येणाऱ्या अशा अल्प प्रतिसादामुळे अगदी किरकोळ बाबींसाठी सुध्दा लेखा परिच्छेदांचा समावेश अहवालामध्ये करण्यात येतो व नंतर याबाबतचे सखोल परिक्षण केल्यानंतर अशा बाबी निदर्शनास येतात त्यामुळे समितीचा बहुमोल वेळ वाया जातो. सबब, इथून पुढे अशा प्रकारचा निष्काळजीपणा जिल्हा परिषदेमार्फत दाखविण्यात येणार नाही.याबाबत खबरदारी घेण्यात यावी व त्या अनुषंगाने परिपत्रक निर्गमित करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

(६) खाजगी प्राथमिक शाळांना वेतन अनुदानाचे दुबार प्रदानामुळे झालेली अनियमितता (जिल्हा परिषद, लातूर)(३.५८)

सन १९९६-९७ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद, लातूर यांनी अनुदानित खाजगी प्राथमिक शाळेत एकच कालावधीसाठी दोन वेळा वेगवेगळ्या प्रमाणकाद्वारे एकूण रुपये ६,५९,७९९ इतक्या रकमेचे प्रदान केले. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना विचारले असता सहायक लेखा अधिकारी (शिक्षण), श्री.एन.एम.कुलकर्णी यांनी या संबंधिच्या नोंदवह्या व्यवस्थित ठेवल्या नाहीत. नोंदवह्या तपासणीचे काम हेतूपुरस्सर टाळले त्यामुळे या प्रकरणी श्री.एन.एम.कुलकर्णी सहायक लेखा अधिकारी (शिक्षण) हे दोषी असून त्यांच्याकडून याबाबतचे स्पष्टीकरण मागविण्यात आले असल्याचे समितीस सांगितले. संबंधित अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांकडून द.सा.द.शे. १२ टक्के इतक्या व्याजाने संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आली असून संबंधित शाळेच्या मुख्यध्यापकांच्या दोन वेतनवाढी स्थगित करण्यात आल्या आहेत. इतकेच नव्हे तर, संबंधित अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांची

मान्यता काढून घेण्याबाबत शिक्षण उप संचालक, औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात आल्याचे सचिवांनी समितीस सांगितले. एकाच वेळेसाठी दोन वेळा अनुदान घेतल्याप्रकरणी संबंधित शाळांची मान्यता काढून घेण्यात यावी व लेखा अधिकारी, शिक्षण तसेच अन्य अधिकाऱ्यांवरील आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे प्रलंबित असलेली चौकशी पूर्ण करुन एक महिन्यात त्याचा अहवाल देण्यात यावा अशी समितीची शिफारस होती.

उपरोक्त शिफारशींसंदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत ग्रामविकास व जलसंधारण विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :---

(१) श्री.एस.एल.धवन तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर व श्री.के.बी.मॅनमावार तत्कालीन लेखा अधिकारी यांना शासनाने दोषमुक्त ठरविलेले आहे.

(२) श्री.एस.जी.पेरके, श्री.आर.एस.मुदाळे, श्री.एस.एन.पवार, तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्रा.) जि.प.लातूर व श्री.जी.वाय.कुलकर्णी तत्कालीन अधीक्षक वर्ग-२ यांचा विभागीय चौकशीचा प्रस्ताव पत्र क्र. जिपला/साप्रवि/आस्था/३/१०५/९९, दिनांक २५ मे १९९९ अन्वये मा.शिक्षण संचालक, म.रा.,पुणे यांच्याकडे पाठविलेला आहे.

(३) श्री.एन.एम.कुळकर्णी तत्कालीन सहायक लेखा अधिकारी, शिक्षण विभाग प्राथमिक, जि.प., लातुर यांचे निवृत्ती वेतन वाढीच्या एक टप्प्याने कमी करण्यात आल्याची शास्ती करण्यात आली आहे. उर्वरित श्री.व्ही.व्ही.आलाबादे, श्री.बी.के.कदम, श्री.टी.डी.केदासे, श्री.व्ही.बी.शिंदे यांना पत्र क्र. जिपला/साप्रवि/आस्था-३/१२६/०३, दि.९ मे २००३ अन्वये विभागीय चौकशीतून दोषमुक्त करण्यात आलेले आहे.

२५

समितीने उपरोक्त माहितीच्या आधारे मंत्रालयीन विभागीय सचिवाची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी सचिव, शालेय विभाग यांनी असा खुलासा केला की, मान्यता काढून घेण्याचे अधिकार शिक्षण समितीला आहेत. शिक्षण समितीने मान्यता काढून घेण्यास नकार दिलेला आहे. या संबंधातील अहवाल आमच्याकडे आलेला आहे. पैसे व्याजासहित मिळालेले आहेत.

अभिप्राय व शिफारशी :-

संबंधित अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांकडून १२ टक्के इतक्या व्याज दराने संपूर्ण रक्कम वसूल करण्यात आली असली तरी देखील जबाबदार असलेल्या तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी व लेखा अधिकारी तसेच संबंधित तत्कालीन शिक्षणाधिकारी व तत्कालीन लेखा सहायक यांनी या प्रकरणी निष्काळजीपणा केला असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. ही बाब विचारात घेता, **संबंधित जबाबदार असणाऱ्यांना दोषमुक्त ठरविण्यात आले आहे, ही बाब समितीला तितकीशी संयुक्तिक वाटत नाही. पुन्हा एकदा संबंधित प्रकरणाचे पुनर्विलोकन करुन संबंधितांना कोणत्या**

परिस्थितीत दोषमुक्त करण्यात आले आहे, याबाबतची पुन्हा एकदा चौकशी करुन अंतिम निष्कर्ष काढण्यात यावा. त्याचप्रमाणे, शिक्षणाधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला असल्याबाबत सांगितले आहे. तरी. संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे का? त्या चौकशीमध्ये ते दोषी आढळले का? या प्रश्नांची उत्तरे अनुत्तरीतच राहिलेली आहेत. त्यामुळे समिती निर्णयाप्रत येऊ शकत नाही. अत: संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांवर कोणत्या प्रकारची कारवाई केली आहे याबाबतची माहिती तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(७) ढाकणी कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजनेच्या कामात ठेकेदाराला अतिप्रदान (जिल्हा परिषद, लातूर)(३.१४९)

लातूर जिल्हा परिषदे अंतर्गत रुपये ५,९५,१००च्या ढाकणी कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजनेस सन १९९२ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली. कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, लातूर यांनी दिनांक ११ फेब्रुवारी,१९९३ ला कार्यादेश दिले. योजनेचे काम पूर्ण होण्याचा कालावधी १२ महिने इतका होता. दिनांक ११ फेब्रुवारी, १९९४ पर्यंत हे काम पूर्ण व्हावयास पाहिजे होते. दरम्यानच्या काळात कंत्राटदाराला ३-४ वेळेस मुदतवाढ देण्यात आली. पाणीपुरवठा योजनेचे काम अंतिमत: दिनांक २० डिसेंबर १९९५ ला पूर्ण झाले. योजनेचे काम पूर्ण होण्यास लागलेल्या विलंबाची कारणे विशद करताना त्या भागात झालेला भूकंप, गावातील सामाजिक वातावरण योग्य नसणे, पाण्याच्या टाकीचे संकल्पचित्र बदलणे, खुदाई करताना कठीण दगड लागणे, अशी असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी समितीस सांगितले. समितीला ही कारणे उचित वाटत नाहीत. योजनेच्या कामात झालेला विलंब हा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, लातूर यांनी केलेल्या दुर्लक्षामुळे झालेला आहे असे समितीचे मत आहे. समिती तत्कालीन कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,

लातूर यांनी हे काम पूर्णत्वास नेण्यास केलेल्या दिरंगाईबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करते. त्यामुळे त्यांच्या गोपनीय अहवालात समितीच्या नापसंती संबंधातील नोंद करण्यात यावी अशी शिफारस होती.

ढाकणी कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजनेचे मूळ अंदाजपत्र रूपये ५,९५,१०० इतके होते. या योजनेस उक्त रकमेसाठी सन १९९२ मध्ये प्रशासकीय मान्यता घेण्यात आली होती. खुदाईमध्ये कठीण दगड लागणे, विहिरीचे क्षेत्रफळ बदलणे इत्यादी कारणे पुढे करून योजनेचे रुपये ७,७३,५२२ इतके सुधारित अंदाजपत्रक तयार करुन यास कोणाचीही मान्यता न घेता कंत्राटदारास दिनांक ३१ मार्च १९९७ रोजी रकमेचे अंतिमत: प्रदान करण्यात आले.

या अनियमिततेबाबत समितीने साक्षीच्या वेळी सचिवांना विचारले असता सुधारित अंदाजपत्रकास कोणाचीही मान्यता न घेता कंत्राटदारास रूपये २.३६ लाख एवढ्या रकमेचे अतिप्रदान झाले असून उक्त रकमेचे वसुलीबाबत कारवाई करण्यात येत असल्याचे समितीस सांगितले.

ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी या योजनेअंतर्गत मूळ नस्तीच गहाळ झाली असून कामात झालेल्या अतिप्रदानबाबत प्रामुख्याने मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच कार्यकारी अभियंता दोषी आहेत. जिल्हा परिषदेतील ३-४ कर्मचारीही यात गुंतले आहेत. वर्ग-१ चे अधिकारी म्हणजे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच कार्यकारी अभियंता यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी त्यासंबंधीचे प्रस्ताव संबंधित विभागास पाठविण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेतील वर्ग-३ च्या ३-४ कर्मचाऱ्यांबाबत कारवाई सुरु करण्यात आली असल्याचे समितीस सांगण्यात आले. पाणीपुरवठा विभागाच्या सचिवांनी सांगितल्याप्रमाणे या पाणीपुरवठा योजनेमध्ये रूपये २.३६ लाख एवढ्या रकमेचे अतिप्रदान झाले असल्यामुळे लातूर जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, कार्यकारी अभियंता व संबंधित इतर कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी. तसेच सदरचे अतिप्रदान झालेले रूपये २.३६ लक्ष एवढ्या रकमेची वसुली

तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, कार्यकारी अभियंता यांचेकडून वसूल करावी व केलेल्या व करीत असलेल्या कारवाईची माहिती समितीला एक महिन्यांत द्यावी. अशीही समितीची शिफारस होती.

उपरोक्त शिफारशीसंदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत जिल्हा परिषदेने व ग्रामविकास विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :--

श्री.एस.बी.झवंर, का.अ., श्री.पी.बी.सोनावणे, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, लातूर यांचेविरु ध्द विभागीय चौकशी प्रस्तावित असल्यामुळे त्यांचे गोपनीय अहवालात नोंद घेण्यात आलेली नाही.

सदर प्रकरणातील श्री.एस.बी.झंवर, कार्यकारी अधिकारी, श्री.पी.बी.सोनावणे, कार्यकारी अधिकारी, पाटबंधारे खाते, श्री.जी.सी.एस.स्वामी, उप विभागीय अधिकारी यांच्या विरोधात खाते चौकशी प्रस्तावित करणास्तव जि.प., लातूरने दिनांक ६ सप्टेंबर २००४ रोजी सुधारीत दोषारोपपत्रे पाटबंधारे विभाग, दक्षता २, मंत्रालय, मुंबई यांना सादर केलेले आहेत या दोषारोपसंबंधाने जलसंपदा विभागाने अ.शा.प.दिनांक २३ मार्च २००७ अन्वये आणखी सुधारीत माहिती मागविण्यात आली होती.

ती जि.प., लातूरने दिनांक १९ मे २००७ अन्वये सादर केलेली होती. तद्नंतर जलसंपदा विभागाने दिनांक २९ मार्च २००८ च्या पत्रान्वये सुधारीत दोषारोपपत्रे व पुरावा पृष्ठर्थ आवश्यक कागदपत्रे सादर करण्याविषयी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना कळविण्यात आले आहे.

तसेच जि.प., लातूर मधील वर्ग ३ चे कर्मचारी श्री.बी.जी.मिरासदार, श्री.जी.एम.रामपूरे व श्री.ए.टी.जगताप यांच्यावर म.जि.प. जिल्हा सेवा शिस्त व अपील नियम, १९६४ मधील नियम ४(१) अन्वये "ठपका" ठेवण्यात आलेला आहे. तसेच तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.सू.ली.धवन, यांच्याबाबत अंतीम अहवाल जि.प., लातूरचे पत्र दिनांक २९ नोव्हेंबर २००७ अन्वये संचालक, लेखा व कोषागारे, नविन प्रशासकीय कुटीर क्र. १५,१६, प्लॉट क्र. १७६, मुंबई यांना सादर केलेला आहे.

समितीच्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे रु .२.३६ लक्ष हे कोणाचीही मान्यता न घेता अतिप्रदान झाले आहेत. तथापि, ढाकणी कायमस्वरूपी नळ पाणीपुरवठा योजनेच्या सुधारीत रु . ७,९९,५०० च्या अंदाजपत्रकास ठराव क्र. ६८० दिनांक १० जुलै २००७ अन्वये जलसंधारण व पिण्याचे पाणी पुरवठा समितीची कार्योत्तर सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाने पुरविलेल्या लेखी माहितीत असे नमूद करण्यात आले :-

सदर प्रकरणातील श्री.एस.बी.झंवर, कार्यकारी अभियंता व श्री.पी.बी.सोनावणे कार्यकारी अभियंता, श्री.जी.सी.एस.स्वामी, उप विभागीय अभियंता (पाटबंधारे खाते) यांच्या विरोधात खाते

चौकशी प्रस्तावित करण्यास्तव जिल्हा परिषद, लातूरने दिनांक ६ सप्टेंबर २००४ रोजी सुधारीत दोषारोपपत्रे, कक्ष अधिकारी, पाटबंधारे विभाग, दक्षता २, मंत्रालय, मुंबई यांना सादर केलेली आहेत. या दोषारोप संबंधाने जलसंपदा विभागाने अ.शा.पत्र दिनांक २३ मार्च २००७ अन्वये आणखी सुधारीत माहिती मागविण्यात आलेली होती ती जि.प., लातूरने दिनांक १९ मे २००७ अन्वये सादर केलेली आहे

तसेच जिल्हा परिषद, लातूर मधील वर्ग-३ चे कर्मचारी, श्री.बी.जी.मिरासदार, स.ले.अ.श्री.जी.एम.रामपूरे, शा.अ. व श्री.ए.टी.जगताप, शा.अ. यांच्यावर महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा शिस्त व अपिल नियम, १९६४, नियम ४(१) अन्वये कार्यवाही केलेली आहे.

तसेच तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, श्री.सू.ली.धवन, यांच्याबाबत अंतिम अहवाल जि.प.लातूर पत्र दिनांक २९ नोव्हेंबर, २००७ अन्वये मा. संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय कुटीर क्र.१५, १६, प्लॉट क्र.१७६, मुंबई यांना सादर केलेला आहे.

लेखा परिक्षण अहवालात सूचविल्याप्रमाणे रु ७,९९,५००च्या अंदाजपत्रकास ठराव क्र.६८० दिनांक १० जुलै २००० अन्वये जलसंधारण व पिण्याचे पाणीपुरवठा समितीची कार्योत्तर सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने मंत्रालयीन विभागाच्या सचिवांची दिनांक ६ मे २००८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी असा खुलासा केला की, ढाकणी पाणीपुरवठा योजना १९९२-१९९३ मध्ये मंजूर करण्यात आली होती ही योजना एक वर्षामध्ये पूर्ण करणे आवश्यक होते. मागील रेकॉर्ड पाहिले तर फेब्रुवारी, १९९३ मध्ये या केसमध्ये परवानगी दिली असताना १९९४ पर्यंत योजना पूर्ण होणे आवश्यक होते परंतु डिसेंबर, १९९५ मध्ये योजना पूर्ण झाली. कामामध्ये विलंब झाल्यामुळे जे जबाबदार असतील त्यांच्या गोपनीय अहवालात नोंद करावी त्याचप्रमाणे जे अतिप्रदान झालेले आहे त्याची चौकशी करून ती रक्कम कॅफो आणि कार्यकारी अभियंता, यांच्याकडून वसूल करावी अशा दोन शिफारशी समितीने केल्या होत्या. सदर विषयाच्या बाबतीत समितीने मागील काळात विभागीय सचिवांची तसेच संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष नोंदवून घेतली आहे. त्यावेळी या प्रकरणाबाबतची स्पष्टपणे माहिती आलेली दिसून येत नाही असे दिसून येते. ढाकणी पाणीपुरवठा योजनेच्या कामास जिल्हा परिषदेने दिनांक १४ डिसेंबर १९९२ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे त्यावेळी या योजनेची किंमत ५ लाख ९५ हजार रुपये एवढी होती त्यानंतर या योजनेच्या कामाची निविदा मागविण्यात आली होती आणि ती निविदा स्थायी समितीसमोर ठेवण्यात आली होती. भाववाढ झाल्याने २८.०५ टक्के जास्त दराने निविदा प्राप्त झाली असल्याने सदर विषय स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला शासनाचे

आदेश लक्षात घेता स्थायी समितीला जास्तीच्या दराची निविदा मान्य करण्याचे अधिकार होते, त्या अधिकारात स्थायी समितीने २८.०५ टक्के जास्त दराने निविदा मान्य केली आणि त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात आली. तसेच सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक ७ लाख ३० हजार रुपयांचे झाले परंतु या योजनेच्या कामावर प्रत्यक्ष ७ लाख ९९ हजार रुपये खर्च झालेला आहे.

या योजनेच्या कामाचे मूळ अंदाजपत्रक ५ लाख ९५ हजार रुपयांचे होते आणि प्रत्यक्षात खर्च ७ लाख ९९ हजार रुपये झाला आहे. त्यामुळे २ लाख ३६ हजार रुपयांची रक्कम अतिप्रदान करण्यात आली असा आक्षेप नोंदविण्यात आला आहे. परंतु या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक ७ लाख ३० हजार रुपयांचे झाले असून त्यास वेळीच स्थायी समितीने मान्यता दिली असेल तर अतिप्रदानाची रक्कम ६९ हजार रुपये एवढीच होऊ शकते या प्रकरणासंबंधीची संपूर्ण माहिती अजून प्राप्त झालेली नाही. विहीर खोदताना कठीण खडक चार मिटरवर लागणे अपेक्षित होते परंतु प्रत्यक्षात कठीण दगड ९ मिटरवर लागला म्हणून सदर विहिरीचे बांधकाम ९ मिटरपर्यंत करावे लागले विहिरीच्या बांधकामात वाढ झाली त्यामुळे विहिरींच्या किंमतीत वाढ झाली त्याचप्रमाणे डी.एस.आर. मध्ये देखील वाढ झाली अशा विविध कामामुळे या योजनेच्या कामावर जास्त खर्च झालेली आहे असे सचिवांनी प्रतिपादन केले. विविध कारणामुळे योजनेच्या कामावर जास्त खर्च झाला असावा असे सकृत दर्शनी

वाटत असले तरी प्रत्यक्षात योजनेच्या कामावर रक्कम अतीप्रदान झाली आहे किंवा नाही याबद्दल अजून निश्चित माहिती करुन घेणे आवश्यक आहे. ७ लाख ३० हजार रुपयांचे सुधारीत अंदाज पत्रक करण्यात आले त्यावेळी स्थायी समितीची मान्यता घ्यावयास पाहिजे होती, ती मान्यता घेण्यात आली नाही. सन २००० मध्ये समितीने विभागाच्या सचिवांची आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. त्या कालावधीत जिल्हा परिषदेत जलसंधारण व पाणीपुरवठा समिती स्थापन करण्यात आली व त्यानंतर सुधारीत अंदाज पत्रकाच्या रक्कमेस कार्योत्तर मान्यता घेण्यात आली सदर प्रकरणी अधिकारी यांनी निश्चितपणे चूक केलेली आहे याबद्दल शंका असल्याचे कारण नाही. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची चौकशी पूर्ण झाली आहे. परंतु त्या चौकशी संदर्भातील सखोल माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. या प्रकरणी त्यांना फक्त समज देण्यात आली आहे परंतु त्यांच्या चौकशी संदर्भातील सखोल माहिती प्राप्त झालेली नाही. याप्रकरणी त्यांना फक्त समज देण्यात आली आहे. परंतु त्यांच्या चौकशी संदर्भातील सखोल माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील भाष्य करणे योग्य होईल. या प्रकरणाशी संबंधीत कक्ष अधिकाऱ्यावर ठपका ठेवण्यात आलेला आहे. आतापर्यंतच्या दोन्ही चौकशी मध्ये वसुलीचा विषय आलेला नाही. या प्रकरणी फक्त दोन कार्यकारी अभियंता यांचेवर कारवाई करण्याचे राहीले आहे. सदरहू कार्यकारी अभियंता यांचे विरुध्द दोषारोपपत्रे तयार करुन जलसंपदा विभागाकडे पाठविली होती परंतु त्यात काही उणिवा निदर्शनास आल्या, त्या उणिवांची पूर्तता

करण्यात यावी असे जिल्हा परिषदेस कळविण्यात आले आहे या योजनेच्या कामासाठी २ लाख ३६ हजार जास्तीचा खर्च झाला आहे की, ६९ हजार रुपये जास्तीचा खर्च झाला आहे ही बाब सिध्द करुन घेणे आवश्यक आहे. जर २ लाख ३६ हजार रुपये जास्तीचा खर्च झालेला असेल तर त्याबाबतीत काळजीपूर्वक कारवाई करावयास पाहिजे या प्रकरणी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यामध्ये विलंब झालेला आहे. ही बाब सचिवांनी मान्य केली व सदर प्रकरणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचा चौकशी अहवाल प्राप्त झालेला नाही. कार्यकारी अभियंता यांचे विरुध्द दोषारोपपत्र जलसंपदा विभागाकडे दाखल करण्यात आली होती. परंतु त्यात काही उणीवा असल्यामुळे त्या उणीवांची पुर्तता जिल्हापरिषदेच्या स्तरावरुन करण्यात यावी असे त्यांना कळविण्यात आले आहे. असे देखील साक्षीच्या वेळी नमूद केले. तसेच जिल्हा परिषदेकडून उणिवांची पूर्तता झाल्यानंतर संबंधित कार्यकारी अभियंता सेवानिवृत्त झालेला आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचा चौकशी अहवाल आल्यानंतर त्यातील तपशील पाहून त्यानंतर योग्य ती कारवाई करुन त्यांच्याबाबतीत काय कारवाई केली गेली या संबंधीचा अहवाल सादर करण्यात येईल. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, सदरहू अहवाल समितीला किती दिवसात सादर केला जाईल त्यावर असे सांगण्यात आले की, यासंबंधीचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात येईल.

अभिप्राय व शिफारशी :-

लातूर जिल्हा परिषदे अंतर्गत असलेल्या ढाकणी कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजनेचे मूळ अंदाजपत्रक ५ लाख ९५ हजार रूपयांचे होते व प्रत्यक्षात खर्च ७ लाख ९९ हजार रूपये झालेला आहे. त्यामुळे २ लाख ३६ हजार रूपयाचे अतिप्रदान करण्यात आल्याचे आक्षेप नोंदविण्यात आले होते. पंरतु कामास विलंब झाल्याने ७ लाख ३० हजार रूपयाचे सुधारित अंदाज पत्रक तयार करण्यात आले व त्यास स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात आली. त्यामुळे अतिप्रदानाची रक्कम रूपये ६९०००/- होऊ शकते अशी माहिती समोर साक्षीच्या दरम्यान आली. **त्यावरून असे दिसून येते की, सदर योजनेवर प्रत्यक्षात रक्कम अतिप्रदान झाली आहे किंवा नाही झाली असेल तर किती याबाबतची माहिती विभागास अद्यापपर्यंत घेता आली नाही. ही बाब अत्यंत खेदजनक आहे. सन २००० मध्ये जेव्हा विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात आली तेव्हा जिल्हा परिषदेने पाणीपुरवठा समिती स्थापन करून सुधारित अंदाज पत्रकास कार्योत्तर मान्यता घेतली, त्यामुळे सदर प्रकरणी जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी निश्चितच अक्षम्य चूक केलेली आहे. त्यामुळे संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला लवकरात लवकर पाठविण्यात यावी. एक तर समितीने आपल्या अहवालात सदर प्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांची चौकशी करून मुख्य लेखा व**

वित्त अधिकारी आणि कार्यकारी अभियंता यांच्याकडून रक्कमेची वसुली करण्यात यावी अशी शिफारस केली होती. असे असताना देखील विभाग अद्यापपर्यंत सदर योजनेत किती रक्कमेचे अतिप्रदान झाले आहे हे निश्चित करू शकला नाही ही बाब अतिशय गंभीर असून सदर अहवाल सभागृह सादर होऊन जवळपास सात वर्षे उलटलेली आहेत ही बाब लक्षात घेऊन अतिप्रदान रक्कम निश्चित करून संबंधितांकडून १२% व्याजाने वसूल करण्यात यावी व त्याप्रमाणे संबंधितांवर कारवाई करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

(८) लेखा परिच्छेदांवर कारवाई करणेबाबत :-

संबंधित जिल्हा परिषदांच्या पदाधिकाऱ्यांना आपल्या जिल्हा परिषदेसंदर्भात कोणते लेखा आक्षेप घेण्यात आले आहेत हे माहित नसते. त्यामुळे जिल्हा परिषदांनी लेखा परिच्छेद पदाधिकाऱ्यांपुढे ठेवून वर्षातून किमान एक वेळ लेखा परिच्छेदांवर करावयाच्या कारवाईसंबंधात बैठक घेण्यात यावी व ग्रामविकास विभागाने यासंबंधात एक परिपत्रक त्वरीत निर्गमित करून त्याची एक प्रत समितीला पाठविण्यात यावी. अशी समितीची शिफारस होती.

उपरोक्त शिफारशींसंदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला पुरविलेल्या लेखी माहितीत ग्रामविकास व जलसंधारण विभागाने खालीलप्रमाणे खुलासा केला :-

या प्रकरणी विभागाने शासन परिपत्रक क्रमांक परास-१०२०/प्र.क्र.५०६७/३८, दिनांक २० फेब्रुवारी,२००१ निर्गमित केले आहे. (परिशिष्ट-अ)

<u>अभिप्राय व शिफारशी :-</u>

अभिप्राय-नाही.

परिशिष्ट 'अ '

(शासन निर्णय व परिपत्रके)

३५

<u>जिल्हा परिषदेला देण्यात येणाऱ्या एकंदर निधीपैकी ७० टक्के निधी अपूर्ण बांधकामसाठी राखून ठेवणेबाबत.</u>

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

परिपत्रक क्र. पंरास १००१/प्र.क२९०/जल३

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ०१/१०/२००१

पंचायती राज समितीने सर्व जिल्हा परिषदांना भेट दिल्यानंतर समितीच्या असे निदर्शनास आले की, अनेक जिल्हा परिषदांमध्ये अपूर्ण बांधकामे तशीच ठेवून नव्या बांधकामांना मंजुरी दिली जाते व त्यामुळे जुनी बांधकामे अनेक वर्षापर्यंत प्रलंबित राहतात व त्यात नवीन बांधकामाची भर पडत असते. सबब, पंचायती राज समितीने तिच्या २०००-२००१ च्या ५ व्या अहवालात पुढीलप्रमाणे शिफारस केलेली आहे.

यापुढील काळात जिल्हा परिषदेला देण्यात येणाऱ्या एकंदर निधीपैकी ७० टक्के निधी हा अपूर्ण बांधकामासाठी राखून ठेवण्यात यावा व ३० टक्के निधी नवीन कामासाठी देण्यात यावा.

समितीला अनेक जिल्हा परिषदांच्या बाबतीत असेही आढळून आले आहे की, कामाची यादी ३-४ वर्षापूर्वी मंजूर करुन ठेवलेली असते. परंतु कंत्राटदार नेमलेले नसतात. याचे मुख्य कारण म्हणजे हा विषय जिल्हा परिषदेच्या सभेपुढे येत नाही व परिणामी प्रशासकीय मान्यता दिली नाही असे सांगितले जाते. या संदर्भात समितीने पुढीलप्रमाणे शिफारस केलेली आहे.

जिल्हा निधीमधून घ्यावयाच्या कामाच्या बाबतीत जिल्हा परिषदेच्या लेखा संहितेप्रमाणे मान्यता दिली पाहिजे. कामांना इतरांनी प्रशासकीय मान्यता देणे योग्य नाही. तसेच कंत्राटदार निश्चित केल्यानंतर तो जर बरोबर काम करत नसेल तर ते पाहण्याची जबाबदारी संबंधित खाते प्रमुखाची राहील. कामाला उशीर होत असेल किंवा आवश्यकतेपेक्षा अधिक खर्च होत असेल तर संबंधित कंत्राटदाराला दंड करून त्या खर्चाची वसुली करून संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावे. कामास उशीर झाल्यास पर्यवेक्षकीय काम करणाऱ्या अधिकाऱ्याच्या गोपनीय अहवालात तशा प्रकारची नोंद घेण्यात यावी.

समितीने केलेल्या शिफारशींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. जिल्हा परिषदांकडील अपूर्ण कामांबाबत विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने वेळोवेळी तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे. या विभागाचे परिपत्रक क्र. लपायो.२००१/प्र.क्र.१०४/जल-१, दि.१४-९-२००१ अन्वये पुढीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

१. नवीन कामे हाती घेण्यापूर्वी निधी उपलब्धतेची खात्री करून व अधीक्षक अभियंता, ल.पा. (स्था.स्तर), मंडळ यांची पूर्व संमती घेऊन कामे सुरु करण्यात यावी.

२. जिल्हा नियोजन व विकास समितीकडून उपलब्ध होणा-या निधीचा वापर जिल्हा परिषदेकडे आतापर्यंत निर्माण झालेले दायित्व विचारात घेऊन अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी प्रथमत: करावा.

या सर्व बाबींचा विचार करता अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करावीत असे शासनाचे आदेश आहेत. जिल्हा परिषदेला वर्षभरात विविध विभागाकडून ल.पा.योजनांसाठी प्राप्त झालेल्या निधीमधून अपूर्ण कामांसाठी व नवीन कामांसाठी किती निधी खर्च केला याचे विवरणपत्र वर्षाच्या अखेरीनंतर जून महिन्यांपर्यंत या विभागास सादर करावे. याप्रमाणे सन २००१-२००२ या वर्षात मिळालेल्या निधीच्या खर्चाचे विवरणपत्र दिनांक २० जून, २००२ पर्यंत शासनास सादर करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ना. बा. पाटील),
सचिव, जलसंधारण

<u>जिल्हा परिषदेच्या प्रत्येक खाते प्रमुखांनी दर</u>
<u>महिन्याला रकमेचा ताळमेळ घालण्याबाबत</u>

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास व जलसंधारण विभाग,

परिपत्रक क्र.पंरास-१०२०/प्र.क्र.४०८/जल-३,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १८ मार्च, २००२.

परिपत्रक

पंचायती राज समितीने वर्धा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी लघु सिंचन विभागातील रोखपालाने केलेल्या अपहाराबाबत समितीच्या असे निदर्शनास आले की, संबंधित लेखा अधिकारी, वित्त लेखा अधिकारी व कार्यकारी अभियंता यांनी रकमेचा वेळीच ताळमेळ न घातल्यामुळे रोखपालाला अफरातफर करावयास वाव मिळाला. असे प्रकार पुन्हा उद्‌भवू नये म्हणून पंचायती राज समितीने खालीलप्रमाणे शिफारस केली आहे. -

"जिल्हा परिषदेच्या प्रत्येक खाते प्रमुखांनी व वित्त व लेखा अधिका-यांनी दर महिन्याला रकमेचा ताळमेळ घालावा व तसे केल्याबद्दल त्याची एक प्रत प्रमख कार्यकारी अधिकारी विभागीय आयुक्त यांना सादर करण्यात यावी."

उपरोक्त शिफारशीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ना. बा. पाटील),

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम

सन १९९६-९७ मध्ये बांधलेल्या शौचालयाच्या तपासणीचा गोषवारा

अ.क्र.	जिल्हा	एकूण बांधलेली शौचालये	नमूना तपासणी केलेली शौचालये	त्यापैकी चांगल्या दर्जाची शौचालये	त्यापैकी साधारण दर्जाची शौचालये	त्यापैकी निकृष्ट दर्जाची शौचालये	त्यापैकी अपूर्ण शौचालये	त्यापैकी अनियमित वापर असलेली शौचालये
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)
१	ठाणे	१३१६४	३००	१२६	१५९	१३	२	६
२	रायगड	११०३९	३००	१७४	११८	८	०	७
३	रत्नागिरी	१३६४१	३००	२४३	५७	०	०	०
४	सिंधुदुर्ग	७९४५	३००	२२१	७१	३	५	११
५	नाशिक	१६३५२	३००	१५८	१२८	१४	०	४८
६	धुळे	१४१४०	३००	३२	२१९	०	४९	३१
७	जळगांव	१८०१७	३००	२३०	५६	०	१४	३५
८	अहमदनगर	१५५५३	३००	२६६	३४	०	०	१५
९	पुणे	१५८१२	३००	२४४	५६	०	०	०
१०	सातारा	१९८८८	३००	२८१	१९	०	०	०
११	सांगली	९९१५	३००	२५५	४५	०	०	४
१२	सोलापूर	२३३९८	३००	१७९	८५	३१	५	१३६
१३	कोल्हापूर	२२७५५	३००	२१८	८२	०	०	०
१४	औरंगाबाद	१३६४३	३००	१६३	७४	५९	४	२५
१५	जालना	१३४१५	३००	२०७	९२	१	०	८७
१६	परभणी	१७१२७	३००	१७९	१२१	०	०	१७८
१७	बीड	१३४९०	३००	२०५	८६	९	०	६७
१८	नांदेड	१७९३५	३००	१३२	१६४	४	०	७५
१९	उस्मानाबाद	११४१५	३००	१०९	१४१	२५	२५	१३६

२०	लातूर	१५२७८	३००	३९	८७	११	१६३	१५६
२१	बुलढाणा	१५४७३	३००	२०४	७८	१५	३	५५
२२	अकोला	१०२०५	३००	२०७	९२	१	०	३१
२३	अमरावती	१२१९२	३००	१७२	१२०	८	०	३६
२४	यवतमाळ	१२५३२	३००	२१३	६४	२२	१	०
२५	वर्धा	२७४८	३००	९७	२०२	१	०	११
२६	नागपूर	९९०८	३००	३००	०	०	०	०
२७	भंडारा	१२४३६	३००	२२८	६८	१	३	६४
२८	चंद्रपूर	९२०४	३००	२१३	७४	१३	०	५१
२९	गडचिरोली	५५५९	३००	२३२	६३	५	०	५१
एकूण		**३९४१७९**	**८७००**	**५५२७**	**२६५५**	**२४४**	**२७४**	**१३१६**

ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत बांधलेल्या शौचालयापैकी अपूर्ण असलेली शौचालये पूर्ण करुन घेण्यात आलेली आहेत. तसेच शौचालयच्या वापराबाबत संपूर्ण स्वच्छता अभियान, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान व निर्मल ग्राम पुरस्कार योजनेंतर्गत जनजागृती केलेली असून,
त्यामुळे शौचालयाचा वापर वाढलेला आहे.

<u>प्रलंबित परिच्छेद विशेष</u>

<u>निपटारा धडक मोहिम</u>

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास व जलसंधारण विभाग,

परिपत्रक क्र.अेयुडी-२००१/प्र.क्र.२३४०/३०

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ मार्च, २००१

<u>परिपत्रक :</u>

महालेखापाल व स्थानिक निधी लेखा विभाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीच्या आधारे महालेखापाल यांचेकडील ४३५३ व स्थानिक निधी लेखा विभाग यांचेकडील १,२०,२६३ एवढे परिच्छेद प्रलंबित असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. याबाबत शासनाने वेळोवेळी सूचना देऊनही दिवसेंदिवस परिच्छेदांची संख्या वाढतच आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन १९९६-९७, १९९७-९८ व १९९८-९९ च्या नागरी अहवालातही "जिल्हा परिषदेने निकाली न काढलेले निरिक्षण अहवाल" या मुद्दयांचा समावेश करण्यात आला आहे. व प्रसंगी विभागाच्या सचिवांना याबाबत लोकलेखा समितीसमोर व पंचायती राज समितीसमोर साक्ष द्यावी लागते. सन १९९९-२००० मध्ये या विषयावरील प्रारूप परिच्छेद प्राप्त झालेला आहे ही बाब नक्कीच भूषणावह नसून जिल्हा परिषदेची पर्यायाने राज्याची प्रतिमा मलिन करणारी आहे. या प्रलंबित परिच्छेदामध्ये शासनाचा निधी व जिल्हा परिषदेचा निधी गुंतलेला आहे. व या रक्कमा नियमित करणे आवश्यक आहे. या सर्व गोष्टी टाळण्याच्या दृष्टीने **<u>प्रलंबित परिच्छेद विशेष निपटारा धडक मोहीम</u>** हाती घेण्यात यावी असे शासनाचे आदेश आहेत. ही मोहीम यशस्वीरित्या राबविण्याची जबाबदारी सर्वस्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची राहील या विशेष निपटारा धडक मोहिमेचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील :-

(अ) ही प्रलंबित परिच्छेद विशेष निपटारा धडक मोहिम या नावाने दिनांक १ एप्रिल, २००१ ते ३१ मे, २००१ या कालावधीत राबविली जावी.

(ब) मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद स्तरावर समिती गठित करण्यात यावी या समितीचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे सदस्य सचिव असतील व मुख्य कार्यकारी अधिका-यांना नामनिर्देशित केलेले विभाग प्रमुख आणि गटविकास अधिकारी हे समितीचे सदस्य राहतील. समितीने परिच्छेदांशी संबंधित विभाग प्रमुख/गटविकास अधिकारी यांच्या समवेत आढावा बैठक घेऊन त्यांना उद्दिष्ट ठरवून द्यावे व आवश्यक तेथे मुख्य लेखा व वित्त अधिकारी/खाते प्रमुखांचे मार्गदर्शन घेण्याबाबत सूचित करावे. परिच्छेदांच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेला अनुपालन अहवाल योग्यरित्या, मुद्देसुद तयार केला आहे. याची छाननी करून ते मान्यतेसाठी संबंधित प्राधिका-यांकडे पाठविण्यात यावे. यासाठी संबंधित खातेप्रमुख व गटविकास अधिका-यांना जबाबदार धरण्यात यावे.

(क) जिल्हा परिषदेकडे एकूण किती परिच्छेद प्रलंबित होते. त्यापैकी किती परिच्छेदांचे वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही केली, किती परिच्छेद शिल्लक राहिले, याबाबत जिल्हा परिषदेतील विभागनिहाय, पंचायत समिती निहाय, माहिती शासनाला दरमहा सादर करण्यात यावी. या कार्यवाहीमध्ये प्रथम सर्वात जुने परिच्छेद निकाली निघतील याकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

(ड) सदर मोहिमेतील निपटा-याचे एकूण उद्दिष्ट ८० % ठरविण्यात यावे.

(फ) ज्या खात्याने/पंचायत समितीने परिच्छेदांचा निपटारा ८० % पर्यंत केला त्यातील संबंधित कर्मचारी, अधिकारी यांच्या गोपनीय अहवालात त्यांच्या कामगीरीची आवर्जून नोंद घेण्यात यावी.

प्रलंबित परिच्छेदाचा निपटारा धडक मोहीम पूर्णपणे यशस्वी होईल यांची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जयश्री चौधरी,

सहसंचालक व उप सचिव, महाराष्ट्र शासन

<u>प्रलंबित परिच्छेद विशेष निपटारा</u>

<u>धडक मोहिम, २००८-२००९</u>

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास व जलसंधारण विभाग,

परिपत्रक क्र.अेयुडी-२००८/प्र.क्र.२७८०/वित्त-८

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ मार्च, २००८

<u>वाचा :</u>

१) परिपत्रक क्रमांक-अेयूडी-२००१/प्र.क्र. २३४०(३०), दिनांक ७ मार्च, २००१. दि.२५ जून, २००१, दि.२ ऑगस्ट, २००२, दि.३१ मे, २००३.

२) परिपत्रक क्रमांक-अेयूडी-२००१/प्र.क्र. २५०१/ वित्त-२५०१/वित्त-८(३०), दि.९ ऑक्टोबर, २००३.

३) परिपत्रक क्रमांक-अेयूडी-२००३/प्र.क्र. २५०१/वित्त-८(३०), दि.६ ऑगस्ट, २००४.

४) परिपत्रक क्रमांक-अेयूडी-२००३/प्र.क्र. २५०१/वित्त-८(३०), दि.१९ मे, २००५

५) परिपत्रक क्रमांक-अेयूडी-२००५/प्र.क्र. २६०६/वित्त-८, दि.२९ मे, २००६, दि.६ नोव्हेंबर, २००६.

६) परिपत्रक क्रमांक-अेयूडी-२००७/प्र.क्र. २५७३०/वित्त-८, दि.२८ मे, २००७

परिपत्रक :

महालेखापाल, स्थानिक निधी लेखा व पंचायती राज समितीच्या जिल्हा परिषदेकडील प्रलंबित परिच्छेदांचा जलद गतीने निपटारा होण्याच्या दृष्टीने उपरोक्त संदर्भाधीन २८ मे, २००७ च्या परिपत्रकान्वये **"प्रलंबित परिच्छेद विशेष निपटारा धडक मोहीम"** राबविणे बाबतच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आल्या होत्या. तथापि, वारंवार मुदतवाढ होऊनही याबाबत सर्व जिल्हा परिषदांची माहिती घेण्यात आली असता, बहुसंख्य जिल्हा परिषदांकडून प्रलंबित परिच्छेदांच्या अनुपालनासाठी विशेष प्रयत्न झाले नाहीत, असे आढळून आले आहे.

२. याबाबत महालेखापाल यांच्या नागरी अहवालात सदर मुद्दा समाविष्ट असतो, त्यामुळे **"लोकलेखा समिती व पंचायती राज समितीसमोर प्रधान सचिवांना साक्ष द्यावी लागते."** त्यामुळे सर्वात जुने असणारे प्रलंबित परिच्छेद प्राधान्याने निकाली काढणे आवश्यक आहे. विशेष निपटारा धडक मोहिमेचा कालावधी संदर्भाधीन क्र. ४ च्या परिपत्रकान्वये दिनांक ३१ मार्च, २००८ पर्यंत वाढवून देण्यात आला होता, तरीही सन २००७-२००८ या कालावधीत दिनांक ३१ डिसेंबर, २००७ अखेरपर्यंत स्थानिक निधी लेखा, पंचायती राज समिती व महालेखापाल यांच्या एकत्रित प्रलंबित परिच्छेदांची संख्या १,७८,१०५ इतकी आहे. ही स्थिती निश्चितच समाधानकारक नाही. तेव्हा प्रलंबित परिच्छेद विशेष निपटारा धडक मोहिमेची कालावधी पुढे चालू ठेवणे आवश्यक आहे. मा.मुख्य सचिवांनी सदर बाबीला विशेष प्राधान्य देण्याचे सूचित केलेले असल्यामुळे "प्रलंबित परिच्छेद निपटारा धडक मोहिमेचा कालावधी सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाकरिता दिनांक ३१ मार्च, २००९ पर्यंत वाढवून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे."

३. सन २००८-२००९ या वर्षीच्या "विशेष धडक मोहिमेच्या" कार्यक्रमामध्ये प्रथम तिमाहीमध्ये सन, १९९५ पूर्वीचे प्रलंबित परिच्छेद निरंक करण्याचे उद्दिष्ट प्रत्येक जिल्हा परिषदेला देण्यात येत आहे. तसेच, त्या पुढील तिमाहीमध्ये सन १९९५- ते २००७ या कालावधीतील प्रलंबित परिच्छेद प्राधान्याने निकाली काढावेत व प्रत्येक तिमाही अहवालासोबत त्याचे वेगळे विवरणपत्र शासनास पाठविण्यात यावे.

४. मुख्य कार्यकारी अधिका-यांनी दरमहा केलेल्या प्रगतीचा अहवाल विभागीय आयुक्तांना सादर करावा. विभागीय आयुक्त कार्यालयाने दर तिमाहीनंतर दहा दिवसांच्या आत या विभागाकडे आपल्या विभागाचा एकत्रित अहवाल सोबतच्या विवरणपत्र (अ,ब,क,ड) मध्ये सादर करावा. यापूर्वीच्या अनुभवावरुन विभागीय आयुक्त कार्यालयांकडून त्रैमासिक विवरणपत्र वेळेवर या विभागाकडे पाठविले जात नाही, असे दिसून आले आहे. त्यामुळे विभागीय आयुक्त कार्यालयाने आपल्या विभागांची याबाबतची मासिक विवरणपत्रे वेळेवर शासनास प्राप्त होतील याबाबत दक्षता घ्यावी. तसेच याबाबीकरिता शासनाने पुढीलप्रमाणे उपाययोजना आखलेल्या आहेत ---

(१) विभागीय आयुक्तांना विनंती करण्यात येते की, त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कामाच्या मूल्यमापनामध्ये सदर बाबीस विशेष महत्व द्यावे. वर्षाअखेर साध्य केलेल्या (८० %) प्रगतीवरुन शासनस्तरावर प्रथम पाच क्रमांक काढण्यात येतील. याबाबत प्राप्त होणा-या यशांबाबत योग्य ती नोंद संबंधितांच्या गोपनीय अहवालांमध्ये घेण्यात यावी.

(२) मुख्य कार्यकारी अधिका-यांनी जास्तीत जास्त प्रलंबित परिच्छेदांचा निपटारा केल्याची अथवा न केल्याची योग्य ती नोंद संबंधित विभाग प्रमुख व गट विकास अधिकारी यांच्या गोपनीय अहवालांमध्ये घ्यावी.

(३) विभाग प्रमुख व गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित अधिकारी यांनी जास्तीत जास्त परिच्छेदांचा निपटारा केल्याची/न केल्याची नोंद त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये घ्यावी.

(४) मुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी यांनी हे परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/अधिकारी/कर्मचारी यांच्या नजरेस आणून द्यावे.

तरी मा.मुख्य सचिवांनी सूचित केल्याप्रमाणे "प्रलंबित परिच्छेद विशेष निपटारा धडक मोहिम" पूर्णपणे यशस्वी होईल यासाठी सर्व स्तरावरील संबंधितांनी दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ना.रा. भागवत,
उप सचिव, महाराष्ट्र शासन
पंचायत राज संस्थांच्या लेखा परीक्षा
आक्षेपावर कारवाईबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास व जलसंधारण विभाग,

शासन परिपत्रक क्र.पंरास-१०२०/प्र.क्र.५०६७/३८

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० फेब्रुवारी, २००१

परिपत्रक :

महाराष्ट्र विधान मंडळाच्या पंचायती राज समितीच्या जिल्हापरिषद, लातूर, भेटीच्या वेळी असे आढळून आले की, पंचायत राज संस्थेच्या लेखा परीक्षा आक्षेपावर त्वरेने कार्यवाही होत नाही. त्यामुळे अनेक आक्षेप प्रलंबित राहतात. अशा वेगवेगळ्या जिल्हा परिषदांच्या थकित आक्षेपांची संख्या ही प्रमाणाबाहेर आहे. या आक्षेपांबाबत वेळोवेळी आढावाही घेण्यात येत नसल्याचे आढळून आले आहे. या आक्षेपा संदर्भात जिल्हा परिषद आणि आयुक्त या कार्यालयामध्ये तत्परता दिसून येत नाही.

पंचायती राज समितीला आढळून आलेल्या निरीक्षणांसंदर्भात शासन असे आदेश देत आहे की, ---

१. आयुक्तांनी स्वत: त्यांच्या अधिनस्त मुख्य अधिकारी यांच्या आढावा बैठकीत लेखा परीक्षा आक्षेपावरही आढावा घेतला पाहिजे. तसेच फक्त सांख्यिकी आढावा न घेता गंभीर परिच्छेदावरील कार्यवाहीबाबतही आढावा घ्यावा. आयुक्त कार्यालयातील विकास शाखेतील उप आयुक्त (तपासणी) यांची जबाबदारी राहील की, त्यांनी याबाबतची वस्तुस्थिती आयुक्तांच्या निदर्शनास आणावी विभागातील प्रलंबित लेखा परिक्षा आक्षेपबाबत अहवाल आयुक्तांना सादर करावा.

२. मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० च्या कलम १० नुसार लेखा परिक्षा आक्षेप विषय समित्या समोर चर्चेसाठी ठेवावेत. जिल्हा परिषदेतील प्रत्येक खाते प्रमुखाने त्यांच्या संबंधात विषय समितीमध्ये लेखा परीक्षा अहवाल विशेष सभेमध्ये घेऊन चर्चेसाठी ठेवावा. जेणेकरुन लोकप्रतिनिधींना लेखा आक्षेपांची संपूर्ण कल्पना येईल.

३. लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील आक्षेप त्यांची सद्य:स्थिती याबाबत जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा होणे आवश्यक आहे. यासाठी अर्थसंकल्प मान्य करावयाच्या सभेत किंवा त्या अगोदरच्या दिवशी विशेष सभा बोलावून त्यामध्ये सदर आक्षेपावर सविस्तर चर्चा व्हावी. प्रत्येक विभागाच्या खाते प्रमुखांची जबाबदारी राहील की, त्यांनी लेखा आक्षेपांची माहिती सादर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जयश्री चौधरी,

उप सचिव, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट 'ब'

(बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

मंगळवार, दिनांक ६ मे, २००८

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

(१) श्री.राजन पाटील, वि.स.स., तथा समिती प्रमुख

(२) श्री. दिलीप बनसोड, वि.स.स.

(३) श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स.

(४) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.

(५) श्री. सुभाष बने, वि.स.स.

(६) श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(७) श्री. सुनील केदार, वि.स.स.

(८) श्री. अतुल देशकर, वि.स.स.

(९) श्री. सदाशिवराव लोखंडे, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री.एस.के गोयल, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, (अतिरिक्त कार्यभार),

(२) श्री.अजितकुमार जै, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,

(३) श्री.विद्याधर कानडे, प्रधान सचिव, वित्त विभाग, (व्यय),

(४) श्रीमती शर्वरी गोखले, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग,

(५) श्री.एकनाथ पाटील, सचिव (लाक्षेवि), जलसंधारण विभाग,

(६) श्री.दी.बा.देशपांडे, सचिव, (बांधकाम) सार्वजनिक बांधकाम विभाग

(७) श्रीमती गुन्जन किन्नू, मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा,

(८) श्री.प्रवीण गेडाम, मुख्य कार्यकारी अधिकारी, लातूर.

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने पाचव्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग (व्यय), प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, (लाक्षेवि) जलसंधारण विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक, वर्धा व लातूर यांची साक्ष घेतली.

बैठक : दिनांक १० सप्टेंबर २००८

स्थळ : विधान भवन, मुंबई

उपस्थिती

(१) श्री.सुभाष ठाकरे, वि.स.स. तथा समिती प्रमख

(२) श्री.रमेशभाई कदम, वि.स.स.

(३) श्री.माणिकराव जगताप, वि.स.स.

(४) श्री.संपतराव अवघडे, वि.स.स.

(५) श्री.आशिष जयस्वाल, वि.स.स.

(६) श्री.तुकाराम सुर्वे, वि.स.स.

(७) श्री.अण्णासाहेब माने-पाटील, वि.स.स.

(८) श्रीमती अनुसया खेडकर, वि.स.स.

(९) श्री.टी.पी.कांबळे, वि.स.स.

(१०) श्री.विष्णू सवरा, वि.स.स.

(११) श्री.हेमंत पटले, वि.स.स.

(१२) श्री.राजन तेली, वि.प.स.

(१३) श्री.विक्रम वसंतराव काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री.भा.ना.कांबळे, सह सचिव

(२) श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव

(३) श्री.ता.नि.मिसाळ, अवर सचिव

संक्षिप्त कार्यवृत्त :

समितीने तिस-या अनुपालन अहवालाच्या प्रारूपावर विचार करुन काही सुधारणांसह संमत केला.